संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. २३.११.२०२४ | अंक नं. २२२ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

## विक्रमी मताधिक्क्य मिळवत संग्राम जगताप यांची हॅटट्रीक



- २००९ मध्ये स्व. अनिल राठोड यांच्या ३९,५४५ मतांचा विक्रम मोडित; २०२४ मध्ये संग्राम जगताप यांचा ३९,६०२ मतांचा नवा विक्रम
- माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांचा धक्कादायक पराभव; सलग आठ वेळा विजयी होणाऱ्या थोरांतांना नवख्या अमोल खताळ यांचा धक्का
- राज्यात पुन्हा महायुती सत्तेवर; महाविकास आघाडीचा दारुण पराभव



जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक


संस्थापक के. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## वाचवाल तरच वाचू...

जागतिक तापमानवाढीमुळे पृथ्वीवरील ऋतुचक्र, हवामानात मोठे बदल झाले आहेत, होत आहेत. अलनिनो, लानिनोच्या सततच्या प्रभावामुळे जगभरच्या दैनंदिन हवामानावर प्रभाव पडला आहे. त्यामुळे ढगफुटी, अति पाऊस, वादळे, उष्णता, महापूर, थंडीची लाट, रोगराई अशी नैसर्गिक संकटे वारंवार येत आहेत.

भारतीय हवामान विभागाच्या म्हणण्यानुसार या वर्षीचा ऑक्टोबर महिना १९०१ नंतरचा देशातील सर्वात उष्ण महिना ठरला आहे. या महिन्यात सरासरी सामान्य तापमानापेक्षा १.२३ अंश सेल्सिअस तापमान अधिक होते. १२४ वर्षानंतरची ही उष्णता वॉर्निंगच म्हणायला हवी.

गेल्या अनेक दशकांपासून जागतिक तापमानात होणारी वाढ ही आता अतिगंभीर टप्प्यावर आली आहे. पण या मुद्यावर काहीही ठोस उपाययोजना होत नाहीत. उलटे विकसित देश याची जबाबदारी विकसनशील देशांवर ढकलतात. जेव्हा की सर्वाधिक






कार्बनडाय ऑक्साइडची वाढ प्रगत देशांतच होते. सोलर व इतर उर्जेचा वापर सुरू झाला असला तरी आजही जागतिक स्तरावर कोळसा, कच्चेतेल, नैसर्गिक वायू यांचा सर्वाधिक वापर केला जातो.

जागतिक उपाययोजनांच्या आशा, उपाययोजनांचा प्रारंभ ढाला असला तरी यावर प्रचंड काम करावे लागतील. त्यातच विविध देशांतील वाढती युद्धजन्य परिस्थिती वातावरण धोकादायक बनवत आहे. यामुळे आता हवामानात इतके चढउतार होऊ लागले आहेत की नागरी जीवनासह पशुपक्ष्यांनाही आता भयावह त्रास सहन करावा लागत आहे.

म्हणूनच आपली जीवसृष्टी, वसुंधरा वाचवण्यासाठी आपणच सुरुवात करू या. एक छोटीशी पणती अंधकार हटवू शकत नाही पण...

# विक्रमी मताधिक्क्य घेत संग्राम जगताप यांची हॅटट्रीक

## जगताप यांना १ लाख १७ हजार ३३२ तर प्रतिस्पर्धी उमेदवार अभिषेक कळमकर यांना ७७ हजार ८८० मते

नगर - अहमदनगर शहर विधानसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार संग्राम जगताप यांनी विक्रमी मताधिक्क्याने विजयी होत हॅटट्रीक केली आहे. स्व. अनिल राठोड यांच्यानंतर सलग तीनवेळा विधानसभेची निवडणूक आणि तीही विक्रमी मताधिक्क्य घेऊन जिंकण्याची किमया जगताप यांनी केली आहे. यापूर्वी स्व. राठोड यांनी २००९ मध्ये ३९ हजार ५४५ मताधिक्क्य घेऊन विक्रमी विजय मिळवला होता. त्या विक्रमाला मागे टाकत जगताप यांनी ३९ हजार ६०२ मताधिक्क्याने विजय मिळवला आहे.जगताप यांना १ लाख १७ हजार ३३२ मते मिळाली. तर त्यांचे प्रतिस्पर्धी महाविकास आघाडीचे उमेदवार अभिषेक कळमकर यांना ७७ हजार ८८० मते मिळाली. जगताप यांना पोस्टलची ९५० मते तर कळमकर यांना पोस्टलची ८०० मते मिळाली आहेत. या निवडणुकीत मनसेचे उमेदवार सचिन डफळ यांना अवघी १ हजार १२० मते मिळाली. तर 'नोटा'ला १ हजार ५७२ मते मिळाली आहे.

शहर विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी शनिवारी (दि. २३) वखार महामंडळ एमआयडीसी येथे पार पडली. मतमोजणी २२ फेऱ्यांमध्ये पार पडली. टपाली मतदानात जगताप यांनी आघाडी घेतल्यानंतर पहिल्या फेरीपासूनच जगताप यांच्या मताधिक्क्यात वाढ होत गेली. काही अपवाद फेऱ्यांमध्ये कळमकर यांनी जगताप यांचे मताधिक्क्य कमी केले, परंतु ते त्यांची विजयी घोडदौड रोखू शकले नाहीत. २२ व्या फेरीअखेर जगताप यांनी विक्रमी ३९ हजार ४५२ मताधिक्क्य घेत विजयाची नोंद केली. शहर विधानसभा मतदारसंघात मनसेसह अनेक अपक्ष उमेदवारही आपले नशीब अजमावत होते, परंतु जगताप आणि कळमकर यांच्यातच सरळ लढत झाली असून, त्यात जगताप यांनी बाजी मारली आहे.

संग्राम जगताप यांच्या विजयाची घोषणा होताच महायुतीचे समर्थक कार्यकर्त्यांनी मतमोजणी केंद्राबाहेर तसेच शहर आणि उपनगरात फटाक्यांची आतषबाजी करत गुलाल उधळून जल्लोष केला.

### संग्राम जगताप मंत्रीपदाची संधी?

शहर मतदारसंघातून मोठ्या मताधिक्क्याने सलग तिसऱ्यांदा विजयी झालेले आमदार संग्राम जगताप यांना यावेळी मंत्रिपदाची संधी मिळणार असल्याचा दावा त्यांच्या समर्थ कार्यकर्त्यांकडून केला जात आहे. तसे झाल्यास शहराला स्व. अनिल राठोड यांच्यानंतर प्रथमच मंत्रीपद मिळू शकेल. राठोड यांना २० व्या शतकात (१९९५ साली युती सरकारमध्ये) मंत्रापदाची संधी मिळाली होती त्यानंतर आता २१ व्या शतकात (म्हणजेच २०२४ मध्ये) जगताप यांना मंत्रीपद मिळाल्यास ते शहराच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरू शकते.

# अहमदनगर विधानसभा मतदारसंघ फेरीनिहाय मतदान

| अ. नं. | उमेदवाराचे नाव | पक्ष | फेरी १ | फेरी २ | फेरी ३ | फेरी ४ | फेरी ५ | फेरी ६ | फेरी ७ | फेरी ८ | फेरी ९ | फेरी १० | फेरी ११ | फेरी १२ | फेरी १३ | फेरी १४ | फेरी १५ | फेरी १६ | फेरी १७ | फेरी १८ | फेरी १९ | फेरी २० | फेरी २१ | फेरी २२ | एकूण इव्हीएम मते |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अभिषेक बाळासाहेब कळमकर | राष्ट्रवादी (श. प.) | ३०५३ | ३२४३ | २९६८ | ३३०४ | २८४३ | ३२७७ | ७३७१ | ५५२७ | ५०३८ | २५२५ | २८९३ | ३२४८ | ३०२३ | ४००५ | ३६३८ | ३८३४ | ४३०४ | २३९६ | २६५४ | ४१०३ | ३९६० | ६७३ | ७७८८० |
| २ | उमाशंकर शामबाबू यादव | बसपा | १७ | १७ | २८ | १३ | ०९ | १३ | १२ | ०४ | १५ | ०८ | १२ | १२ | ०८ | ०८ | १३ | १० | ११ | १३ | १८ | ११ | २० | ०४ | २७६ |
| ३ | सचिन चंद्रभान डफळ | मनसे | ५९ | १११ | ४० | १२५ | ७९ | ७१ | १३ | २८ | २९ | ५४ | २४ | ६४ | ७५ | २८ | ४४ | ३७ | २२ | ६४ | ३८ | ६१ | ४९ | ०६ | ११२१ |
| ४ | संग्राम अरुणकाका जगताप | राष्ट्रवादी (अ. प.) | ५६२५ | ६९३६ | ६६७६ | ७५०६ | ६३८३ | ५९०१ | २३६८ | ३६१० | ४७१२ | ५३६८ | ४७६२ | ५५४२ | ६६३८ | ३३२१ | ४८७१ | ४४२६ | ६३१८ | ७७०७ | ६०९२ | ५७८० | ५६८९ | १२०१ | ११७३३२ |
| ५ | शिवाजीराव वामन डमाळे | एसएएसपी | १८ | १६ | १८ | ११ | १६ | १५ | ०५ | ०८ | २७ | १८ | १२ | १३ | २४ | ०६ | १३ | १२ | १४ | १८ | २३ | २० | २२ | ०५ | ३३४ |
| ६ | हनिफ जैनुद्दीन शेख | वंचित | २७ | २४ | ३४ | १४ | १३ | ०७ | २४ | ३३ | ३३ | ३८ | २७ | ४३ | २१ | ०३ | ०७ | १२ | २१ | २१ | ९६ | ३० | ४१ | १६ | ५८५ |
| ७ | उत्कर्ष राजेंद्र गिते | अपक्ष | ०५ | १३ | ०३ | १२ | १८ | २२ | १० | १५ | २३ | ८२ | २९ | ३८ | २९ | ३२ | ४२ | २६ | १५ | ११ | १२ | १२ | १२ | ०० | ४६१ |
| ८ | कळमकर गणेश बबन | अपक्ष | ०२ | ११ | ०९ | १२ | १० | ०७ | १४ | १३ | ०८ | ०८ | ०६ | ०६ | ०९ | १० | १० | ११ | ०९ | ०७ | ११ | ११ | ०७ | ०६ | १९७ |
| ९ | काळे किरण नामदेव | अपक्ष | ०३ | ०३ | ०१ | ०३ | ०१ | ०२ | ०१ | ०० | ०७ | ०२ | ०२ | ०० | ०६ | ०२ | ०३ | ०१ | ०४ | ०१ | ०३ | ०० | ०३ | ०१ | ४९ |
| १० | गाडे शशिकांत माधवराव (सर) | अपक्ष | ०६ | ०२ | ०४ | ०४ | ०८ | ०९ | ०८ | ०४ | ०५ | ०२ | ०४ | ०८ | ०५ | ०२ | ०२ | ०० | ०१ | ०३ | ०६ | १० | ०६ | ०२ | १०१ |
| ११ | बारसे प्रतिक अरविंद (पप्पूभाऊ) | अपक्ष | ४३ | ३७ | ३५ | ४० | २६ | ३३ | ४० | ५५ | ७५ | २७ | ३० | ४७ | ३४ | २५ | २० | ३२ | ३९ | ३७ | ४७ | ८४ | १०९ | १२ | ९२७ |
| १२ | मंगल विलास भुजबळ | अपक्ष | १९ | १९ | १८ | ०९ | ०५ | १७ | ०७ | ०८ | ४० | १५ | १५ | १८ | १४ | ०५ | ०७ | ०८ | १९ | २७ | ३० | ३३ | २४ | ०४ | ३६१ |
| १३ | राठोड सचिन बबनराव | अपक्ष | ०७ | ०२ | ०४ | ०४ | ०१ | ०४ | ०२ | ०३ | ११ | ०४ | ०५ | ०३ | ०५ | ०३ | ०५ | ०३ | ०७ | ११ | ०६ | १० | १० | ०२ | ११२ |
| १४ | सुनिल सुरेश फुलसौंदर | अपक्ष | ०५ | १० | १७ | ११ | ०५ | ०७ | ११ | ११ | २६ | ०६ | १३ | १० | १३ | ०७ | १० | ११ | १० | १४ | ०७ | २६ | २१ | ०४ | २५५ |
| १५ | नोटा | -- | ६२ | ११० | ५९ | १०७ | ८५ | ८१ | ४९ | ५९ | ६३ | ६७ | ५८ | ७२ | ८९ | ४७ | ५४ | ६८ | ७६ | ७५ | ७५ | ९५ | १०६ | १५ | १५७२ |

## बंधाऱ्यात तरंगताना आढळला अनोळखी तरुणाचा मृतदेह

नगर - नगर तालुक्यातील चास शिवारात सोनेवाडी रोड वर असलेल्या नदीवरील बंधाऱ्यातील पाण्यात तरंगताना एका अंदाजे ३५ वर्ष वयाच्या तरुणाचा मृतदेह आढळून आला आहे. या मृतदेहाची ओळख पटविण्याचे आवाहन नगर तालुका पोलिसांनी नागरिकांना केले आहे.

चास शिवारात सोनेवाडी रोड वर असलेल्या नदीवरील बंधाऱ्यातील पाण्यात १७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी एका तरुणाचा मृतदेह तरंगताना काही नागरिकांनी पाहिला. त्यांनी ही माहिती नगर तालुका पोलिसांना कळविली. ही माहिती मिळताच नगर तालुका पोलिस ठाण्यातील उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे यांनी पोलिस पथकासह घटनास्थळी भेट देत नागरिकांच्या मदतीने मृतदेह पाण्याबाहेर काढला. तो शवविच्छेदनासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठविला. याबाबत नगर तालुका पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

सदर मृतदेहाची ओळख पटलेली नाही. मयताच्या उजव्या हातात काळा करदोरा बांधलेला असून हातावर क्रॉस गोंधलेले असून या तरुणाबाबत काही माहिती मिळाल्यास नगर तालुका पोलिस ठाण्यात (फोन- २०४१-२४१६१२२) किंवा तपासी अंमलदार भाऊसाहेब झावरे (मो. ९४२१५५९३४४) यावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## मतदानाच्या दिवशीच्या मारहाण प्रकरणी गुन्हा दाखल

### बोल्हेगाव येथील मतदान केंद्रावर झाली होती एकास मारहाण

नगर - विधानसभा निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी बोल्हेगाव येथील मतदान केंद्रावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार अभिषेक कळमकर यांचे मित्र उमेश पंढरीनाथ भांबरकर (वय ४०, रा. भुतकरवाडी) यांना मारहाण झाल्याची घटना घडली होती. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून उपचारादरम्यान त्यांनी दिलेल्या जबाबावरून सहा जणांविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अभिषेक वाकळे, भाऊसाहेब पुंड, रामा काते, प्रशांत बेलेकर, संतोष वाटमोडे, भाऊसाहेब तानाजी वाकळे (सर्व रा. बोल्हेगाव) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. बुधवारी (दि.२०) विधानसभा निवडणुकीसाठी मतदान असल्याने उमेश भांबरकर व सुवर्णा सालके (पूर्ण नाव, पत्ता नाही) हे बोल्हेगाव येथील जिल्हा परीषद शाळेत असलेल्या मतदान केंद्रावर गेले होते. तेथे काही व्यक्ती मतदान केंद्रापासून १०० मीटरच्या आतमध्ये विनाकारण उभ्या असलेल्या दिसल्या. तेव्हा सुवर्णा यांनी त्या व्यक्तींना बाजूला करण्याचे पोलिसांना सांगितले. तेव्हा अभिषेक हा त्यांना तुम्ही आम्हाला कोण सांगणार्यो असे म्हणाला. त्यानंतर सुवर्णा यांना कोण घेऊन आले आहे असे म्हणून अभिषेक व इतरांनी उमेशला शिवीगाळ, मारहाण करून जखमी केली. त्यावेळी अभिषेक म्हणाला, 'थांब मतदानाचा निकाल लागु दे, मी तुला पाहून घेतो' तर रामा याने 'थांब मतदान होवु दे, तुला ठारच मारतो' असे बोलून धमकी दिली. जखमी उमेश यांच्यावर रूग्णालयात उपचार सुरू आहेत. अधिक तपास पोलीस अंमलदार प्रदीप बडे करत आहेत.

## मुरलीधर मिसाळ यांचे वृद्धापकाळाने निधन


नगर - नगर शहरातील नालेगाव आमोद अपार्टमेंट येथील



मुरलीधर शंकरराव मिसाळ (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.ते अत्यंत धार्मिक व मनमिळावू स्वभावाचे होते.त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम मध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुन, पुतणे, नातवंड असा परिवार आहे. अजय व राहुल यांचे ते वडील होत.

## शिवाजीराव बोठे यांचे अल्प आजाराने निधन


नगर - पारगाव मौला (ता.नगर) येथील रहिवासी शिवाजीराव



बोठे (वय ५७) यांचे २३ नोव्हेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर पारगाव मौला येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. पारगावचे सरपंच वैभव बोठे यांचे ते चुलते होत. त्यांच्या मागे पत्नी, मुले, सुन, नातवंडे असा परिवार आहे.

## बापू पाटील यांचे वृद्धापकाळाने निधन

श्रीरामपूर - येथील सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे सेवानिवृत्त



कर्मचारी बापू भिकाजी पाटील (वय ८५) यांचे २२ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वा. वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात एक भाऊ, दोन मुले, एक मुलगी, सुना, पुतणे, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.

नवनीत पाटील व सुयोग जनरल स्टोअर्सचे मालक सुयोग पाटील यांचे वडील होत.

## सिंधूबाई भालेराव यांचे हृदयविकाराने दुःखद निधन



श्रीरामपूर - येथील सिंधूबाई कारभारी भालेराव (वय ६५) यांचे हृदयविकाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुन, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. रमेश मार्केट येथील अजय किड्स वेअरचे मालक बाबासाहेब व राजेंद्र भालेराव याच्या मातोश्री होत.

# मतमोजणीसाठी जिल्ह्यात १ हजार २५९ कर्मचाऱ्यांची नियुक्ती

### १२ विधानसभा मतदारसंघात मतमोजणी

नगर - जिल्ह्यातील १२ विधानसभा मतदारसंघात शनिवार २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजता मतमोजणीला सुरुवात झाली असून, मतमोजणीसाठी १ हजार २५९ अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सकाळी टपाली मतदानाची मतमोजणी सुरू झाल्यानंतर अर्ध्या तासाने ईव्हीएम यंत्राची मतमोजणी सुरू झाली, अशी माहिती जिल्हा निवडणूक प्रशासनातर्फे देण्यात आली आहे.

मतमोजणीसाठी एकूण उपलब्ध १ हजार ३८५ मनुष्यबळापैकी १ हजार २५९ अधिकारी-कर्मचारी प्रत्यक्षात मतमोजणी कामासाठी नियुक्त असणार आहेत. या मनुष्यबळाची पहिली सरमिसळ १६ नोव्हेंबर, दुसरी २१ नोव्हेंबरला झाली असून तिसरी सरमिसळ मतमोजणीच्या दिवशी पहाटे ५ वा. करण्यात आली.

अकोले विधानसभा मतदार संघासाठी मिटींग हॉल तहसील कार्यालय नवीन इमारत ता. अकोले, संगमनेर - सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात क्रीडा संकुल बॅडमिंटन हॉल, ता. संगमनेर, शिर्डी - प्रशासकीय इमारत, तळमजला, तहसील कार्यालय राहाता, कोपरगाव - सेवा निकेतन कॉन्व्हेंट स्कूल, तळमजला, ता. कोपरगाव, श्रीरामपूर - मध्यवर्ती प्रशासकीय इमारत तहसील कार्यालय, पहिला मजला, ता. श्रीरामपूर येथे मतमोजणी झाली.

नेवासा मतदारसंघासाठी न्यू गव्हर्नमेंट ग्रेन गोडाऊन, उत्तर बाजू खोली क्र.२ संथ मेरीस् स्कुल रोड, मुंकुदपुरा नेवासा फाटा, ता.नेवासा, शेवगाव - शासकीय इमारत तळमजला तहसील कार्यालय शेवगाव, राहुरी - लोकनेते रामदास पाटील धुमाळ न्यु आर्टस सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज राहुरी इनडोअर स्पोर्ट्स हॉल राहुरी, पारनेर - औद्यागिक प्रशिक्षण संस्था वर्कशॉप पारनेर, अहमदनगर शहर - महाराष्ट्र स्टेट वेअर हाऊस कॉर्पोरेशन गोडाऊन नं.६ एम.आय. डी.सी. नागापूर अहिल्यानगर, श्रीगोंदा - गव्हर्नमेंट ग्रेन गोडाऊन नं.३, पेडगाव रोड श्रीगोंदा आणि कर्जत जामखेड विधानसभा मतदारसंघासाठी बॅडमिंटन हॉल, दादा पाटील महाविद्यालय, कर्जत येथे मतमोजणी झाली.

अकोले मतदारसंघातील ३०७ मतदान केंद्रांसाठी मतमोजणीच्या २२ फेऱ्या, संगमनेर २८८ आणि २१, शिर्डी २७१ आणि २०, कोपरगाव २७२ आणि २०, श्रीरामपूर ३११ आणि २३, नेवासा २७६ आणि २०, शेवगाव ३६८ आणि २७, राहुरी ३०८ आणि २२, पारनेर ३६६ आणि २७, अहमदनगर शहर २९७ आणि २२, श्रीगोंदा ३४५ आणि २५, तर कर्जत जामखेड मतदारसंघातील ३५६ मतदान केंद्रांसाठी मतमोजणीच्या २६ फेऱ्या होत आहे. प्रत्येक मतदारसंघात ईव्हीएम मतमोजणीसाठी १४ टेबल लावण्यात आले. प्रत्येक टेबलसाठी त्यासाठी प्रत्येकी १ पर्यवेक्षक, सहाय्यक आणि सूक्ष्म निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली.

# मतदार म्हणून मतदान करणे सक्तीचे ठरणार; अन्यथा सरकारी लाभ आणि अनुदानापासून वंचित ठेवण्याचा प्रस्ताव

### लोकशाही संरक्षण कायद्यासाठी व्यापक आंदोलनात रूपांतर करण्याचा प्रस्ताव, वकील वर्गाचा पुढाकार

नगर - वकील वर्गाच्या पुढाकाराने लोकशाही संरक्षण कायदा येण्यासाठीच्या प्रयत्नाला लवकरच व्यापक आंदोलनांमध्ये रूपांतर होईल, असा निश्चय अनेक वकिलांनी व्यक्त केला आहे. लोकशाही संरक्षण कायद्याच्या मसुद्यात मतदार म्हणून मतदान करणे सक्तीचे ठरणार आहे. त्याचबरोबर कोणत्याही वैध आणि रास्त कारणाशिवाय मतदान न केल्यास पुढील पाच वर्षांसाठी अनेक सरकारी लाभ किंवा अनुदानापासून चुकार मतदारांना वंचित व्हावे लागणार असल्याचा प्रस्ताव असल्याची माहिती ॲड. कारभारी गवळी यांनी दिली.

जगभरातील अनेक लोकशाही देशांमध्ये विशेषत: ऑस्ट्रेलिया, बेल्जियम व ब्राझीलमध्ये मतदारांनी मत न दिल्यामुळे सोयी-सवलती कायद्याने थांबविण्यात आलेल्या आहेत. तशाचप्रकारे भारतात देखील कायदेशीर तरतूद होण्याची गरज आहे. भारतात मोठ्या संख्येने मतदार हे आता पैसे मिळतील, मग पैसे मिळतील असे म्हणत संध्याकाळी ५ वाजेपर्यंत घरातच बसून राहतात आणि मतदान करत नाही. परंतु पैसे मिळाल्यानंतर मतदार मतदान केंद्रात तुफान गर्दी करतात. त्यातून गोंधळ निर्माण होतो. भारतीय संविधानातील कलम ५१ (अ) अंमलबजावणीचा भाग म्हणून मतदारांवर मत द्यावेच लागणार अशी कायदेशीर टांगती तलवार या कायद्याने निर्माण करता येणार असल्याची भूमिका मांडण्यात आली आहे.



जगभर माहिती तंत्रज्ञानाने क्रांती केली आहे. अशा वेळेस भारतातून बाहेर देशात काही काळासाठी नोकरी, उद्योग-धंदे करण्यासाठी गेलेल्या लोकांना देखील मतदानाचा अधिकार बजावता यावा, म्हणून अशा मतदारांना नव्या तंत्राने मतदानाच्या दिवशी ऑनलाइन मतदान करण्याची सोय देखील कायद्याने करता येणार आहे. भारतात सार्वजनिक बाबी संदर्भात लोकमकात्या आणि ढब्बू मकात्या या दोन प्रवृत्ती मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. महाराष्ट्रात नुकतेच झालेल्या मतदानामध्ये पैश्याने फार मोठी भूमिका केल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे एसटी महामंडळाने बाहेरगावावरून येणाऱ्या लोकांची फार मोठी गैरसोय केली. लालपरी गाड्या रस्त्यावरून काढून घेतल्यामुळे नागरिकांचे परवड झाल्याचे स्पष्ट झाले. अशा वेळेस निवडणूक आयोगाचे अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची गरज आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये सुद्धा अनेक उमेदवार निवडणुकीच्या आदल्या रात्री मतदारांच्या बोटावर शाई लावून आणि त्यांचे आधार कार्ड ताब्यात ठेवून मतदारांना मतदानापासून वंचित ठेवले. यापुढे असा प्रकार करणारे समाजकंटकांना कायदेशीर बाबींना तोंड द्यावे लागेल. हा गुन्हा करणाऱ्यांना पाच वर्षापर्यंत सक्तमजुरीची सजेची तरतूद यामध्ये राहणार आहे. एकंदरीत मतदान आणि निवडणुका अतिशय पवित्र आणि कर्तव्याचा भाग म्हणून समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे स्पष्ट केले आहे.

देशात लोकशाही संरक्षण कायदा मुख्यत: छत्रपती शिवाजी महाराजांच्या लोकभक्ती, ज्ञानभक्ती आणि कर्मभक्ती या तत्वावर बेतला जावा आणि कॉ. गोविंद पानसरे यांचे शिवाजी कोण होता? या इतिहास सांगणाऱ्या ग्रंथावर आधारित ठेवण्याचा वकील वर्गाचा प्रयत्न ॲड. एम.एस. सय्यद यांनी म्हंटले आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### कॉफी पिणे धोकादायक

अनेक लोकांना जेवताना किंवा जेवण्याच्या आधी किंवा नंतर कॉफी पिण्याची सवय असते. असे करणे नुकसानकारक ठरते कारण याने शरीरात आयरनचे शोषण बाधित होते. आपण ॲनिमिक असाल तर हे अधिक आवश्यक होऊन जाते.

## पाककला

### बासमती शृंगार

**साहित्य** : २ वाट्या बासमती तांदूळ, १ वाटी खवा, ३ मोठे चमचे साजूक तूप, ३ वाट्या साखर, अर्धी वाटी काजू-बदाम काप पाव चमचा बेदाणे, १ चमचा वेलदोडा पूड, पाव चमचा केशर (दुधात भिजवून), १ मोठा चमचा गुलाबपाणी (इसेन्स नव्हे) आणि थोड्या गुलाबपाकळ्या.

**कृति** : तांदूळ स्वच्छ धुवून निथळावे. तांदळाच्या दुप्पट पाणी घेऊन ते उकळून त्यात मोकळा सळसळीत भात शिजवावा आणि परातीत पसरून गार होऊ द्यावा. साखरेचा तीनतारी पाक करून त्यात खवा, केशर वेलदोडा पूड घालावी. जाड बुडाच्या भांड्यात तूप तापवून काजू-बदाम-बेदाणे परतून त्यावर भात घालावा. साखरेचा पाक, गुलाबपाणी घालून सगळं अलगद मिसळावं. मंद आचेवर तवा ठेवून त्यावर भांडं ठेवावं. घट्ट झाकण ठेवून पाक जिरून वाफ येऊ द्यावी. वाढताना भाताच्या मुदी पाडून वर गुलाबपाकळी लावावी.

## सौंदर्य

### चेहऱ्याचा तेलकटपणा जाण्यासाठी

✻ चेहऱ्याचा तेलकटपणा जाण्यासाठी ज्येष्ठमध पूड पाण्यात कालवून रात्री चेहऱ्याला लावावी.

✻ मेथीची पाने वाटून केसांना लावल्यास व मेथ्या अर्धा-अर्धा चमचा सकाळ-सायंकाळ खाल्ल्यास केस गळणे बंद होते.

## सल्ला

झोपताना एक ग्लास गोड व गरम कोमट दुधामध्ये एक चमचा शुद्ध तूप टाकून मुलांना द्यावे.

## वास्तू

स्टोव्ह, चूल शेगडीजवळ पाण्याचा हंडा वा सिंक ठेवू नये. घरात भांडणे होतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. २४ नोव्हेंबर २०२४

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, कार्तिक कृष्णपक्ष, पूर्वा २२|१७, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. ३० मि.**

## राशिभविष्य

**मेष** : प्रवासात दगदग, पती पत्नीत मतभेद निर्माण होतील. सामुदायिक कार्यांमध्ये अनुकूल. पाकीट चोरी जाईल.

**वृषभ** : कौटुंबिक समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. आर्थिक पक्षाबाबत सावध राहा. सहकाऱ्यांबरोबर प्रतिष्ठा वाढेल. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील.

**मिथुन** : सामान्य स्थितीत मध्यम स्वरूपाची कार्ये पूर्ण होतील. प्रवासाचे योग संभवतात.

**कर्क** : धर्मविषयक कार्यांमध्ये मन रमवावेसे वाटेल. आपणास समाधानकारक स्थिती मिळेल.

**सिंह** : कौटुंबिक आनंदाचे वातावरण राहील. अतःमनावर नियंत्रण ठेवा. सर्व प्रकारचे लाभ होतील

**कन्या** : आरोग्य चांगले राहील. आरोप-प्रत्यारोपांपासून दूर रहाल. शत्रू प्रभावहीन होतील.

**तूळ** : वेळ आनंदपूर्वक व्यतीत होईल. महत्वपूर्ण कार्ये योग्य वेळी होतील.

**वृश्चिक** : निरुपयोगी गोष्टींकडे लक्ष देऊ नका. बेपर्वाईने वागु नका. मनोरंजनाच्या विषयांमध्ये वेळ खर्च होईल.

**धनु** : मानसिक स्थिती आनंददायक राहील. वैवाहिक जीवनात सुख मिळेल. सर्व क्षेत्रात प्रगतीची घोडदौड,

**मकर** : कौटुंबिक विषयांमध्ये धनाचे व्यय होईल. व्यापार-व्यवसायात स्थिती मिश्रित राहील.

**कुंभ** : धार्मिक कार्यांमध्ये खर्च होण्याची शक्यता आहे. मान-सन्मानात वाढ होईल. व्यापार-व्यवसायात आशानुरूप परिणाम मिळतील.

**मीन** : एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीशी भेट आपल्यासाठी आनंदाची ठरेल. वाहने व उपकरणे जपून हाताळावीत.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# हसा आणि शतायुषी व्हा!

**प्रवासी** : (कन्डक्टरला) काहो बसमध्ये मी विडी पिऊ शकतो का?

**कन्डक्टर** : नाही साहेब

**प्रवासी** : काहो! या बसमध्ये विडीचे तुकडे कसे पडलेत!

**कन्डक्टर** : ते त्या लोकांचे आहेत की, ज्यांनी आपल्यासारखे मला प्रश्न विचारले नाहीत!

# ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

✻ सरहद्द गांधी कोणास म्हणतात? - खान अब्दुल गफार खान

✻ गोसीखुर्द धरण कोणत्या नदीवर आहे? - वैनगंगा

✻ रामटेक तालुक्यात कोणता तलाव आहे? - खिंडसी

✻ सविता शब्दाला योग्य पर्याय? - सूर्य

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# शब्दगंध क्र. ७०५६

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ■ | ४ | ५ | | ६ |
| ७ | | | ■ | ८ | | ■ | |
| ९ | | | ■ | | ■ | १० | |
| | ■ | ११ | १२ | | १३ | ■ | ■ |
| ■ | १४ | | | ■ | १५ | १६ | १७ |
| १८ | | ■ | ■ | १९ | | | |
| २० | | २१ | | ■ | | ■ | |
| २२ | | | ■ | २३ | | ■ | |

**शब्दगंध क्र. ७०५५ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| खा | टी | क | ■ | बे | श | र | म |
| स | का | ळ | ■ | ड | ■ | म | द |
| ■ | का | क | डा | र | ती | ■ | र |
| स | र | ळ | ■ | ■ | च | ह | सा |
| प | ■ | ■ | डा | का | ■ | वा | ■ |
| क | रं | ड | क | ■ | मा | ल | क |
| ■ | ज | ग | ■ | मा | ल | दा | र |
| चा | क | र | मा | नी | ■ | र | ण |

**आडवे शब्द :-** १) रागाचा आवेश ४) कर्कशा स्त्री; दुर्दशा; अवकळा ७) स्तुतिपाठक; भाट ८) लढाई, लढाईचे मैदान ९) पक्षघात; अर्धांगवायू १०) वर्तमान दिवस; चालू दिवस ११) नुकतेच जन्मलेले १४) सर्व; समस्त; सारा १५) मुस्लीम वर्षाचा सातवा महिना १८) महिना; मास १९) थंडीपासून बचाव करण्यासाठी कानाला गुंडाळतात ते लोकरीचे लांबट कापड २०) मागे असलेले नोकरचाकर, घोडा, गाडी वगैरे प्रकार २२) उणीव; कमतरता; वानवा २३) पंख असलेली गोष्टीतील स्त्री

**उभे शब्द :-** १) चालविणे २) तारणारा ३) मृदंग; पखवाज ४) एक सुगंधी पूड ५) जखम वगैरेचा शरीरावर राहणारा डाग ६) ज्याची शिकार करावयाची आहे तो प्राणी १२) लांबट उठाणू; मारल्याची खूण १३) एखाद्याची बाजू घेणे; वकिली १४) एका ठिकाणी बसणे उठणे १६) पाणी; नीर; जीवन १७) यशस्विता; भरभराट १८) धनी; स्वामी; पती २१) 'तर'चा जोडीदार; ज्याअर्थी

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : लोक निंदा करोत अगर प्रशंसा; धैर्यशाली पुरुष स्वतःच्या मार्गावरून विचलित होत नाही.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### मेलेला माणूस काही काळाने उठून बसला असे होते का?

एखाद्या चित्रपटात शोभेल अशी घटना! मृत व्यक्तीला तिरडीवर ठेवताच ती व्यक्ती उठून बसते. सगळ्या नातेवाईकांची धावपळ उडते. मग कळते की, ती व्यक्ती खरोखर मेलीच नव्हती.

हृदयाचे ठोके बंद पडले व श्वसन बंद पडले. तरीही काही सेकंदापासून काही मिनिटापर्यंत व्यक्ती जिवंत राहू शकते. या अवस्थेला 'सस्पेंडेड ॲनिमेशन' किंवा 'तात्पुरती मृतावस्था' असे म्हणता येईल. ही अवस्था योगी-ध्यानधारणा करणारे लोक स्वतःच्या इच्छेने आणू शकतात; पण मेंदूचे रोग, दुखापती, बधिरीकरणानंतर, विजेचा धक्का वा उष्णता, बार्बीट्यूरेट वा अफूची अधिक मात्रा घेतल्याने बेशुद्धावस्थेत गेलेल्या व्यक्तींमध्ये सस्पेंडेड ॲनिमेशन ही अवस्था आढळून येते.

त्यामुळेच मृत्यूचे निदान करताना ते फार काळजीपूर्वक करावे लागते. हृदयाचे ठोके स्टेथास्कोपने तपासून, तसेच श्वसनाची क्रिया होते का हे तपासून, पुरेसा वेळ गेल्यानंतर तज्ज्ञ डॉक्टर व्यक्तीला मृत घोषित करतात. मेंदूच्या कार्याचा विद्युत आलेख घेण्याची सोय असल्यास तो घेतात.

५ मिनिटे मेंदूच्या पेशींनी कोणत्याच प्रकारच्या कार्याचे प्रदर्शन आलेखात न केल्यास (हा आलेख म्हणजे केवळ एक सरळ रेषाच येते) व्यक्ती मृत आहे, असे समजता येते. मेलेला माणूस पुन्हा जिवंत होत नाही, हे मात्र लक्षात ठेवा. सस्पेंडेड ॲनिमेशन मधील माणूस पुन्हा जिवंत होतो, कारण तो खरोखर मेलेलाच नसतो. नाहीतर तुम्हाला वाटेल की, ती व्यक्ती नसून भूतच आहे. जगात भूत नसते, हे पक्के लक्षात ठेवा म्हणजे झाले!


## आत्मज्ञान

चांगदेव सिद्धींच्या बळावर १४०० वर्षे जगले होते. त्यांनी मृत्यूला ४२ वेळा परतवून लावले होते. त्यांना प्रतिष्ठेचा मोह होता. त्यांनी संत ज्ञानेश्वरांची कीर्ती ऐकली. संत ज्ञानेश्वरांना सगळीकडे मान मिळत होता. चांगदेव ज्ञानेश्वरांचा मत्सर करू लागले. चांगदेवांना वाटले, ज्ञानेश्वरांना पत्र लिहावे; परंतु पत्राचा आरंभ कसा करावा, हे त्यांना कळेना; कारण ज्ञानेश्वरांचे वय अवघे सोळा वर्षे होते, मग पूज्य म्हणून कसे लिहिणार ? चिरंजीव लिहावे, तर ज्ञानेश्वर महात्मा होते. काय लिहावे काहीच समजेना; म्हणून त्यांनी कोरेच पत्र पाठवले.

संतांची भाषा संतच जाणतात. मुक्ताबाईंनी पत्राला उत्तर दिले, १४०० वर्षे तुझे वय झाले; पण तू तुझ्या पत्रासारखा कोराच राहिलास ! हे वाचून चांगदेवांना वाटले की, अशा ज्ञानी पुरुषांची भेट घ्यावी. चांगदेवांना सिद्धीचा गर्व होता. ते वाघावर बसून आणि सर्पाचा लगाम घेऊन भेटायला निघाले. ज्ञानेश्वरांना समजले की, चांगदेव भेटायला येत आहेत. त्यांचे आदरातिथ्य त्यांना सामोरे जाऊन केले पाहिजे, असे त्यांना वाटले. त्या वेळी ज्ञानेश्वर ज्या भिंतीवर बसले होते, त्या भिंतीलाच त्यांनी चालण्याचा आदेश दिला. भिंत पुढे जाऊ लागली. हे चांगदेवांनी पाहिले आणि त्यांना पटले की, आपल्यापेक्षाही ज्ञानेश्वर श्रेष्ठ आहेत; कारण त्यांचा निर्जीव वस्तूंवरही अधिकार आहे. आपला केवळ प्राण्यांवरच अधिकार आहे. त्या क्षणीच चांगदेव ज्ञानेश्वरांचे शिष्य बनले.

**तात्पर्य** : सिद्धींचा वापर हा आत्मज्ञान मिळवण्याच्या मार्गावरील अडथळा आहे.

# जीवन चक्र - मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)



मंडुक उपनिषद बताता है:- 'आदि एक को न तो बाहरी आँखों से देखा जा सकता है और न ही बाहरी कानों से सुना जा सकता है। इसे न इन्द्रियों द्वारा,

न जपों, तपों, संयमों द्वारा और न ही धार्मिक रीति रिवाजों द्वारा जाना जा सकता है। इसे तो केवल शुद्ध आत्म रूप में, समाधि के ऊँचे ज्ञान द्वारा जाना जा सकता है।

इसी तरह पश्चिमी विद्वान भी कहते हैं:-

## जीवन की रोशनी

सच्ची खुशी इन्द्रियों द्वारा नहीं मिलती क्योंकि यह इनकी पहुँच से दूर है। यदि हम इन्द्रियों के ऊपर उठकर, ऊँचे दृश्यों को पकड़ सकें तो हम अथाह आनंद के स्वामी हो सकते हैं जो केवल विशुद्ध आत्माओं को प्राप्त होता है।

संक्षेप में, ईश्वरीय ज्ञान आत्मा की साईंस और कला है, कोई परमात्मा रूप हुआ या परमात्मा से जुड़ा हुआ सन्त ही जीते जी इसका अमली अनुभव करवाकर पूरी तरह हमारे संदेह को दूर कर सकता है। जीवन एक शुद्ध ज्योति है और हम अपने अन्तर एक अदृश्य सूर्य को छिपाकर बैठे हैं। जीवन और मौत का ज्योति से क्या सम्बन्ध है? मैंने तुम्हें अपनी जीवन ज्योति के स्वरूप में बनाया है। जीवन और मौत के सम्बन्ध ब्रह्म स्वप्न रहित अस्तित्व को देखो। सृष्टि ज्योति भी है और छाया भी, क्योंकि दोनों के बिना कोई चित्र बनना संभव नहीं है। जब तुम समझ लोगे कि कुछ नहीं हो, रोशनी में बदल जाओगे और फलदायक बन जाओगे।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

जब मन में अच्छा अच्छा रहता है, तब शरीर चुस्त रहता है। काम करने में मन लगता है। दिल में उत्साह और उल्लास की तरंगें उठने लगती हैं। ऐसे में जब आप खेलते हैं तो ज्यादा अच्छा खेलते हैं। ऐसे में जब आप पढ़ते हैं तो ज्यादा अच्छा पढ़ते हैं। ऐसे में जब आप गाते हैं तो ज्यादा जब भी करो, तो आप को बहुत अच्छा अच्छा लगे। नकारात्मक सोच मन को दुखी करती है। सकारात्मक सोच मन को ऊर्जावान बनाती है।

प्रकृति का अस्तित्व हमारे से पहले भी था। हमारे न होने पर भी प्रकृति का अस्तित्व रहेगा।

प्राकृति ने ऊंट बना कर उसके पेट में पानी

## अंतरीक बल

की बहुत बड़ी टैंकी भी लगा दी। प्राकृति ने अपनी रक्षा के लिये सांप को जहर दिया, शेर और चीते को तेज दांत दिए । प्राकृति ने मनुष्य को शरीर दिया परंतु मनुष्य की आदते प्राकृति से मेल नहीं खाती जिस कारण से समय नष्ट होता है।

हम जो भी काम करते हैं चाहे छोटा हो या बड़ा उस में ऊर्जा की जरूरत होती है। इसलिए हमें सभी कार्य सूर्य की उपस्थिति में ही कर लेने चाहिए। विद्यार्थी रात २-३ बजे तक पढ़ते है फिर सुबह ९-१० बजे तक सोए रहते हैं। समय प्रबन्धन की दृष्टि से यह गलत है। आप रात १० बजे तक सोने चले जाएं क्योंकि सूर्य सोने चला जाता है। सुबह ४ बजे पढ़ने के लिये उठ जाएं। दिन भर के काम के बाद मस्तिष्क में रात में उतनी क्षमता नहीं रहती कि वह सुबह सुबह ताजे मस्तिष्क का मुकाबला कर सके। सुबह के फूल की ताजगी और शाम के समय के फूल की ताजगी में फर्क होता है। सुबह दो घंटे की पढ़ाई और रात को ५ घंटे की पढ़ाई बराबर परिणाम देती है। आप गर्मी में काफी पीते है और सर्दी में आईसक्रीम खाते ही तो यह

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# साहित्य सहवास - 'निरजजींना मनापासून सलाम...'

जगभरात विविध आचार, विचार, स्वभावविशेष, आकार-प्रकारच्या व्यक्ती आहेत. आपण आपल्या सभोताली पाहिलं तरी हे लक्षात येईल. पैश्यांच्या मागे असलेल्या अनेक व्यक्ती मी, तुम्ही पाहिल्या असतीलंच. पैश्यांसाठी त्या व्यक्ती अगदी काहीही करायला तयार असतात. ज्या व्यक्तींना पैसाच सर्वस्व आहे असं वाटतं अशा व्यक्तींना रक्तनात्याच्या व्यक्तींविषयी, आवड, छंड जोपासणं, गरजवंतांच्या पाठिशी उभं राहाणं, हॉटेलिंग, फॅमिली पिकनिक, सिनेमा-नाटकं पाहाणं, निसर्गाच्या सहवासात जाणं, मैत्रीतलं कर्तव्य निभावणं, प्रकृतीची काळजी घेणं, ज्येष्ठांकडून मार्गदर्शन घेणं- हे असं काहीही करावसे वाटत नाही कारण ह्यातुन पैसा मिळणार नसतो. पैसा महत्वाचा आहेच ह्याबद्दल कुणाचंच दुमत नाही हे पण पैसा किती महत्वाचा आहे ? ह्याचा एकदा तरी विचार करणं गरजेचं आहेच. 'ए जाते हुओ लम्हें, जरा ठहरो, जरा ठहरो. मैं भी तो चलता हुँ, जरा उनसे मिलता हुँ, जो एक बात दिलमें है उनसे कहूँ.. जावेद अख्तर ह्यांनी लिहिलेले, अन्नु मलिक ह्यांनी संगीतबध्द केलेलं, आणि रुपकुमार राठोड ह्यांनी गायलेलं गाणं ऐकलं नसेल तर जरुर ऐका. हे गाणं ऐकतांना, त्या आवाजाशी, त्या संगीताशी एकरुप झालं की खूप छान, प्रसंन्न वाटतं. खरंतर क्षणांना थांबवण्याचं सामर्थ्य कुणातंच नाही. पण तरीसुध्दा त्या क्षणांनी थोडं थांबावं मला तुमच्यासोबत चलु द्या, त्या व्यक्तीला भेटु द्या. माझ्या मनातली गोष्टी त्या व्यक्तीजवळ बोलु द्या...' एक अत्यंत चांगली संकल्पना आहे. कुठं थांबायचं हे जोपर्यंत लक्षात येत नाही तोपर्यंत ह्या पैसाप्रेमी व्यक्ती उर फुटुस्तोवर धावतातंच. १९९१ साली एक व्यक्ती म्हणाली होती ' माणसाचं पोट वितभर आहे हेच चांगलं आहे. म्हशीएवढं माणसाचं पोट असतं तर ?' खरंच हा प्रश्न विचार करायला लावणारा आहे, अंतर्मुख करणारा आहे.

ऑक्टोबर २०२४ मध्ये अमिताभ बच्चन सुत्रसंचालक असलेल्या कौन बनेगा करोडपतीच्या एपिसोडमध्ये डॉ. नीरज सक्सेना हॉटसीटवर आले. कोलकत्यातील एका विद्यापीठाचे ते कुलगुरु आहेत, सायंटिस्ट आहेत. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलामांसोबत काम करायला मिळालं हे जीवनातील भाग्य आहे असं ते समजतात. ते हॉटसीटवर असतांना म्हणाले की मी, माझाच विचार करत होतो परंतु डॉ. कलामांच्या सहवासात राहुन मी माझ्याबरोबर दुसऱ्यांचा व राष्ट्राचा विचार करु लागलो. त्यांना विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं त्यांनी दिली. त्यांच्या बुध्दीमत्तेला मनापासून सलाम. तीन लाख वीस हजार रुपये आणि तेवढीच बोनस रक्कम त्यांनी जिंकली. प्रेक्षकांनी अत्यानंदाने जोरदार टाळ्या वाजवल्या. अमिताभ अकरावा प्रश्न त्यांच्यासमोर ठेवणार त्याचवेळी नीरज सक्सेना म्हणाले, 'सर मै क्वीट करना चाहता हुँ ।' प्रेक्षक आणि अमिताभसुध्दा आश्चर्यचकित झाले. तीनही लाईफ लाईन जीवंत असतांना. एक कोटी रुपये त्यांनी नक्कीच जिंकले असते असं असतांना स्वतः होऊन खेळ का थांबवला असं अमिताभ ह्यांनी विचारलं तेव्हा नीरजजी म्हणाले की माझ्यानंतर आणखीही खेळाडु आले आहेत. ते माझ्यापेक्षा लहान आहेत, त्यांनाही संधी मिळाली पाहिजे. मला खुप पैसे मिळाले आहेत. जो प्राप्त है वो पर्याप्त है।

अधिक की आशा नही है । बच्चनसाहेब अवाक झाले कारण गेल्या २२ वर्षांच्या केबीसीच्या इतिहासात असं कधीच घडलं नाही, हे बच्चनसाहेबांनी सांगितलं. पैसाप्रेमींनी, पैश्यांच्या मागे ऊर फुटुस्तोवर धावणाऱ्यांनी 'नीरज सक्सेना' होता येईल का ? हा प्रश्न एकदाच स्वतःला विचारावा. स्वतःसाठीच जगलात तर मेलात दुसऱ्यांसाठी जगलात तरच जगलात. दुसऱ्यांच्या भल्यासाठी जगणाऱ्या नीरजजींना मनापासून सलाम. खरंच काही व्यक्तींना आपण भेटु शकत नसतो पण त्यांनी आचरणात आलेला सकारात्मक विचार नक्कीच आत्मसात करु शकतो. ही अशी मोठ्या मनाची व्यक्ती होण्याचं भाग्य अत्यंत कमी व्यक्तींच्या नशिबी असतं. डॉ. नीरज सक्सेनाजींसारख्या व्यक्ती आपल्या जवळपास, सभोवताली असाव्यात असं मनापासून वाटतं कारण पैश्यांच्या मागे धावण्याऐवजी माणसांच्या सोबत राहिले की बरंचसं शिकता येतं, 'माणूस' म्हणून अनेकांकडं पाहता येतं. आपलेपण, ममत्व हे पैश्यांपेक्षाही अमूल्य आहे, हे वाक्य मनापासून तुम्हाला आवडेल पण आपलेपण, ममत्वाची अनुभुती घ्याच. दूरदर्शन अथवा मोठा पडदा अथवा नाटकात पाहिलेलं एखादं चांगलं दृश्यही आपलं अवघं आयुष्य चांगल्या अर्थाने बदलवु शकतं. जिसकी सोच सच्ची - अच्छी हो, उसको हर जगह खुबसुरती दिखाई देती है।

(लेख क्र.५२६)

**- सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

गर्भसंस्कार मंत्र आपापल्या धार्मिक परंपरेप्रमाणे तसेच हिंदू पंचांगाप्रमाणे शुभदिवस पाहून, कुलदेवतेच्या साक्षीने व वडिलधाऱ्यांच्या आशीर्वादाने गर्भावस्थेत एकदा तरी विधिपूर्वक मंत्रोपचार करावेत व इतर वेळेला आमची गर्भसंस्कार सि.डी. ऐकावी व त्याचे मनन, चिंतन करावे.

ज्या दिवशी गर्भसंस्कार विधिपूर्वक म्हणायचे असतील त्या दिवशी भावी माता-पित्यास सुवासिक

## गर्भावस्थेतील तपासण्या व लसीकरण

तेल व उटणे लावून आंघोळ करावी व त्यानंतर नवीन कपडे घालावेत. वातावरण पवित्र ठेवावे. घरामध्ये धूप जाळावा.

**पूजा साहित्य -**

आपापल्या धर्मोपासना पद्धतीप्रमाणे मांडणी, पूजा व मंत्रोच्चार करावेत उदा. एक पाट घ्यावा. त्यावर नवीन लाल वस्त्र ठेवावे. त्यावर मध्यभागी थोडे गहू टाकावे. त्यानंतर तो पाट वडिलधाऱ्या व्यक्तींनी, सासू-सासरे किंवा आई-वडिलांनी पूर्व दिशेला ठेवावा.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

## राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या कार्यकारी अध्यक्षपदी न्यायमूर्ती भूषण गवई

नगर – राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाचे कार्यकारी अध्यक्ष असलेले न्यायमूर्ती संजीव खन्ना यांची सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली आहे. राष्ट्रपती डॉ. द्रौपदी मुर्मू यांनी विधी सेवा प्राधिकरण कायदा, १९८७ च्या कलम ३ च्या उप–कलम (२) च्या खंडद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांनुसार सर्वोच्च न्यायालयातील सर्वाधिक ज्येष्ठ न्यायमूर्ती म्हणून न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांची या पदावर नियुक्ती केली आहे.

भारत सरकारच्या कायदा आणि न्याय विभागाने उच्च न्यायालयामार्फत सर्व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, तालुका विधी सेवा प्राधिकरणाला हे कळविले आहे. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेले उच्च न्यायालयातील राज्य विधी सेवा प्राधिकरण मार्फत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि तालुका विधी सेवा प्राधिकरणामार्फत भारतातील सर्व नागरिकांना, विशेषत: उपेक्षित आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील नागरिकांना सुलभ आणि मोफत कायदेशीर मदत केली जाते. कायदेविषयक जनजागृती, लोकन्यायालयाचे आयोजन करून तडजोड योग्य खटले निकाली काढले जातात. ॲसिड, अत्याचाराला बळी पडलेल्या मुली, महिलांना मनोधैर्य योजनेच्या माध्यमातून मदत केली जाते. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या सर्वाधिक दुसऱ्या ज्येष्ठ न्यायमूर्तींकडे हे पद असते. न्यायमूर्ती गवई यांच्या कार्यकारी अध्यक्षतेखाली राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण हे राज्य घटनेचे आर्टिकल ३९ (अ)च्या संवैधानिक आदेशाचे पालन करण्यासाठी विधी सेवेची वचनबद्धता त्यांच्या नेतृत्वाखाली राज्य, जिल्हा आणि तालुका विधी सेवा प्राधिकरण कार्यरत राहणार आहेत.

# महाराष्ट्र स्टेट युथ लीगसाठी नगरमधून फिरोदिया शिवाजीयन्सचा संघ रवाना

### स्पर्धेत सहभागी होणारा जिल्ह्यातील पहिला संघ, या स्पर्धेतून दोन सर्वोत्तम संघ राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत होणार सहभागी


महाराष्ट्र स्टेट युथ लीगसाठी नगरमधून रवाना झालेला फिरोदिया शिवाजीयन्सचा संघ प्रशिक्षकांसमवेत.

नगर – वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनद्वारे आयोजित महाराष्ट्र स्टेट युथ लीग २०२४ साठी नगर शहरातील फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमीचा १५ वर्षा खालील संघ लोणावळ्याला रवाना झाला. या स्पर्धेमधून महाराष्ट्रातील दोन सर्वोत्तम संघ राष्ट्रीय स्तरावरील ऑल इंडिया फुटबॉल फेडरेशन युथ लीग साठी पात्र होणार आहेत. प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या या स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील पहिला संघ म्हणून सहभागी होण्याचा ऐतिहासिक मान फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमी संघास मिळाला आहे.

स्पर्धे दरम्यान भारतातील नामांकित क्लब आणि अकॅडमीचे स्काऊटस खेळाडूंचे परीक्षण करणार आहेत. ही स्पर्धा लोणावळा येथील सिंहगड विद्यापीठाच्या (जि. पुणे) मैदानावर रंगणार आहे. पुढील तीन महिने ही स्पर्धा चालणार आहे. महाराष्ट्र स्टेट युथ लीगसाठी फक्त १० संघांना प्रवेश दिला जातो. यामध्ये फिरोदिया शिवाजीयन्सचा समावेश झालेला आहे.

१३ वर्षा खालील फिरोदिया शिवाजीयन्सचा संघाचे प्रशिक्षण शिबिर सुरू असून, संघ युथ लीगमध्ये डिसेंबरच्या मध्यावर सहभागी होणार आहे. संघ व्यवस्थापक म्हणून मुख्य प्रशिक्षक जेव्हिअर स्वामी, व्यवस्थापक सचिन पाथरे, फिजिओ डॉ. अर्शी बगदादी, सहाय्यक व्यवस्थापक महिमा पाथरे काम पाहत आहे.

शिवाजीयन्स स्पोर्ट्स क्लबचे अध्यक्ष मनोज वाळवेकर आणि शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन ट्रस्टचे मुख्य विश्वस्त नरेंद्र फिरोदिया यांनी संघातील खेळाडूंना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. पल्लवी सैंदाणे, अभिषेक सोनवणे, जोनाथन जोसेफ, राजेश अँथनी यांच्या परिश्रमामुळे फिरोदिया शिवाजीयन्स अॅकॅमीचा संघ या स्पर्धेत दाखल झाला आहे. हा ऐतिहासिक क्षण अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन, अहमदनगर महाविद्यालय, समर्पित खेळाडू आणि नगरकरांच्या पाठिंब्याशिवाय शक्य झाला नसता, अशी भावना नरेंद्र फिरोदिया यांनी व्यक्त केली. संघाला प्रायोजकत्व देणारे ग्रोथ एक्स व आय लव्ह नगरचे खेळाडूंनी आभार मानले.

फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमीचा संघ पुढीलप्रमाणे:– कर्णधार– माहीर गुंदेचा, उपकर्णधार– सौरभ खंडेलवाल, अंशुमन विधाते, आदर्श साबळे, अशोक चंद, अर्हम गुगळे, चिराग गोरे, दर्शन लवारे, फुरकान शेख, हर्षद सोनवणे, इंद्रजीत गायकवाड, जय मुथा, जोएल साठे, मयंक बजाज, नमन दिवाणी, ओम नितीन लोखंडे, ओम राजेंद्र लोखंडे, पवनराजे वाणी, राजवर्धन वीर, सोहेल खान, तक्ष लुणिया, तनीश पडागळे, वेदांत केळगंद्रे, वीरेंद्र वीर, यदुवर कोकरे.

# पूर्णवाद लाईफ मॅनेजमेंट संस्थेच्यावतीने नरेंद्र फिरोदिया यांना उद्योगरत्न पुरस्कार



नगर – येथील पूर्णवाद लाइफ मॅनेजमेंट संस्थेच्यावतीने, यंदाचा उद्योग रत्न पुरस्कार अहिल्यानगर येथील उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांना जाहीर करण्यात आला आहे, अशी माहिती पूर्णवाद परिवाराचे कार्यकर्ते गणेश गवळी यांनी दिली.

दिवंगत डॉ. आर. पी. पारनेरकर यांनी घालून दिलेल्या आदर्शांना अनुसरणाऱ्या पूर्णवाद लाईफ मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट, मुंबई या सामाजिक, आध्यात्मिक समूहाच्यावतीने दरवर्षी पुरस्कार दिले जातात.

डॉ. आर. पी. पारनेरकर हे महाराष्ट्रातील एक महान तत्त्वज्ञ होते. त्यांनी जीवनाच्या सर्व पैलूंना स्पर्श करणारा पूर्णवाद हा विचार मांडला. अनेक शास्त्रांचा तसेच तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. त्यांनी अर्थशास्त्रावर एक ग्रंथही लिहिला आहे. जीवन ही एक कला आहे आणि नैतिकता हे मानवतेचे सार आहे. तज्ञ (नैपुण्य), फॉरवर्ड प्लॅनिंग आणि रिव्ह्यू (योजकता), नेटवर्क (लोक–संग्रह), सार्वजनिक दृष्टिकोनाचा आदर (लोकमत), समकालीन ज्ञान (काल) आणि शेवटची परंतु किमान प्रार्थना यांचा समावेश असलेल्या सहा प्रयत्नांचा त्यांनी विचार विकसित केला.

डॉ. पारनेरकर यांनी सुरू केलेले कार्य त्यांचे पुत्र डॉ. व्ही. आर. पारनेरकर यांनी सुरू ठेवले आहे. (उपासना) प्रत्येकाला याच जीवनात आनंद मिळवण्यास सक्षम करेल. डॉ. पारनेरकरांचे अनुयायी संपूर्ण महाराष्ट्र गुजरात आणि भारताच्या इतर भागात आणि अगदी जागतिक स्तरावर पसरलेले आहेत.

समूहाच्या मुंबई केंद्राने या महान अध्यात्मिक तत्त्ववेत्त्याच्या स्मरणार्थ वार्षिक पुरस्कार म्हणून अर्थशास्त्र आणि उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाचा गौरव करण्यासाठी पुरस्काराची स्थापना केली आहे. यापूर्वी अर्थशास्त्र पुरस्कार प्राप्त झालेल्यांमध्ये डॉ. श्रीनिवास खांदेवाले, अच्युत गोडबोले, डॉ. (सौ.) सुलभा ब्रम्हे, डॉ. अजित रानडे, डॉ. दीपक मोहंती, डॉ. विनायक गोविलकर, वेणुगोपाल दूत, डॉ. आशुतोष रारावीकर, डॉ. विनायक देशपांडे, चंद्रशेखर टिळक, मनीष दाभाडे, सतीश मराठे आणि डॉ. लक्ष्मीकांत पारनेरकर, यांचा समावेश आहे.

उद्योगरत्न पुरस्काराचे यापूर्वीचे प्राप्तकर्ते गजानन पेंढारकर, रवींद्र प्रभुदेसाई, प्रसाद लाड आणि सौ. जयंती कठाळे आहेत. उद्योग क्षेत्रात या देशासाठी दिलेल्या अतुलनीय योगदानाबद्दल या वर्षीचा डॉ. आर. पी. पारनेरकर उद्योग रत्न पुरस्कार २०२५ हा पुरस्कारासाठी नरेंद्र फिरोदिया यांच्या नावाचा प्रस्ताव समोर आला. त्याला पारनेर येथे झालेल्या बैठकीमध्ये पूर्णवाद परिवाराचे प्रमुख विष्णू महाराज पारनेरकर यांनी मान्यता दिली. आणि नरेंद्र फिरोदिया यांचे नाव पुरस्कारासाठी घोषित करण्यात आले, असे गणेश गवळी यांनी सांगितले.

डॉ. आर. पी. पारनेरकर अर्थशास्त्र आणि उद्योग रत्न पुरस्कार प्रदान सोहळा दादर, मुंबई येथे २५ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ६:३० वाजता होणार आहे. रोख पारितोषिक, करंडक आणि सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या पुरस्कार सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहन पूर्णवाद परिवारातर्फे करण्यात आले आहे.


उद्घाटन प्रसंगी खेळाडू समवेत क्रीडा अधिकारी प्रियांका खंदारे, विशाल गर्जे, जेष्ठ क्रीडा शिक्षक राजेंद्र पवार, अमित बडदे, प्रवीण गिते, सूरज खंडीझोड, अरुणोदय क्रीडा प्रतिष्ठानचे महेश आनंदकर, मच्छिंद्र साळुंके, प्रशांत पाटोळे, वैभव देशमुख आदी.

## मनपा आयोजित शालेय कराटे स्पर्धा उत्साहात

नगर– शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद अहील्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय शालेय कराटे क्रीडा स्पर्धा नुकतीच जिल्हा क्रीडा संकुल वाडिया पार्क अहिल्यानगर येथे उत्साहात झाल्या.

स्पर्धेत शहरातील विविध शाळेतील अनेक खेळाडूंनी सहभाग घेतला.स्पर्धेचे उद्घाटन क्रीडा अधिकारी प्रियांका खंदारे, विशाल गर्जे, मनपा क्रीडा अधिकारी वेन्सेंट फिलिप्स जेष्ठ क्रीडा शिक्षक राजेंद्र पवार, कराटे असोसिएशनचे राष्ट्रीयपंच अमित बडदे, प्रवीण गीते,सुरज खंडिझोड,अरुणोदय क्रीडा प्रतिष्ठानचे महेश आनंदकर, वैभव देशमुख, मच्छिंद्र साळुंके, टीम टॉपरचे प्रशांत पाटोळे,सुरज गुंजाळ, आदित्य क्षीरसागर, साबिल सय्यद, राम हरदे, धर्मा घोरपडे, सरफराज सय्यद यांच्या हस्ते झाले.

स्पर्धेसाठी दि इंडियन पॉवर मार्शलआर्ट असोसिएशनचे ग्रँडमास्टर संजय आनंदकर सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले तसेच जालना टीमचे पंच नसिर सय्यद, जुनेद खान, सागर भाले, दीपक मगरे, अशरद सय्यद यांनी पंच म्हणून काम पाहिले. स्पर्धा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्या. विजेत्या खेळाडूंची पुणे विभागीय स्पर्धे साठी अहील्यानगर संघात निवड झाली आहे.


कु.वैष्णवी सुनील गोडळकर हिची जम्मू येथे झालेल्या ऑल इंडिया फेंसिंग (तलवारबाजी) चॅम्पियनशिप स्पर्धेतून खेलो इंडिया युनिर्व्हसिटी गेम, दिल्ली साठी निवड झाल्याबद्दल तिचा सत्कार करताना मिलिंद चवंडके, गोविंदराव मिसाळ, राजेंद्र भागानगरे, बाळासाहेब दहिंडे आदी.

## कु. वैष्णवी गोडळकर हिची तलवारबाजी स्पर्धेकरिता खेलो इंडियासाठी निवड

नगर – येथील लाल मातीच्या तालमीचे वस्ताद पै.तुकाराम गोडळकर यांची नात कु.वैष्णवी सुनील गोडळकर हिची जम्मू येथे झालेल्या ऑल इंडिया फेंसिंग (तलवारबाजी) चॅम्पियनशिप स्पर्धेतून खेलो इंडिया युनिर्व्हसिटी गेम, दिल्ली साठी निवड झाली.

विश्व हिन्दु महासंघाचे गोरक्षा विभाग महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मिलिंद चवंडके तसेच गोविंदराव मिसाळ, राजेंद्र भागानगरे, बाळासाहेब दहिंडे यांनी कु.वैष्णवी हिच्या घरी जावून पुष्पगुच्छ देत कौतुक केले. आपल्या लिंगायत गवळी समाजाचे नाव उंचावण्याचे कार्य तुझ्याकडून घडले. खेलो इंडियासाठी खुप खूप शुभेच्छा, अशा शब्दात तिचे कौतुक करीत अभिनंदन करण्यात आले.

समाजबांधवांनी आपलेपणाने घरी येऊन केलेल्या या कौतुक सोहळ्याने तिचे वडील सुनील तुकाराम गोडळकर आणि आई सौ.सुनंदा सुनिल गोडळकर यांना खुप आनंद झाला. कु.वैष्णवी हिला प्रशिक्षक म्हणून वडिलांचेच मार्गदर्शन लाभते आहे.

लाठी–काठी, दांडपट्टा, तलवारबाजी या मर्दानी खेळाची लिंगायत गवळी समाजात परंपराच चालत आली आहे. वैष्णवीचे वडिल ही समाजातील परंपरा अभिमानाने आणि निष्ठेने जतन करत साबळे वाधिरे कंपनीत मॅनेजर म्हणून कार्यरत आहेत.

# अनुभव व सुरुवात खेळाडूच्या भविष्याला आकार देते

### घनश्याम सानप यांचे प्रतिपादन; शालेय राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत एकलव्य तायक्वांदो अकॅडमीचा दबदबा कायम


शालेय राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत दबदबा निर्माण करणारे एकलव्य तायक्वांदो अॅकॅडमीचे खेळाडू. समवेत घन:शाम सानप, प्रा. माणिकराव विधाते, दिलीप सातपुते, आदी.

नगर – प्रत्येकाच्या आयुष्यामध्ये गुरुचे स्थान अन्यन्नसाधारण आहे गुरु हा आपल्या शिष्याचे भवितव्य घडविण्यात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत असतो अनुभवी गुरू बरोबर भविष्याची सुरुवात निश्चितच शिष्याला नावलौकिक मिळवून देते वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये मग ते शिक्षणक्षेत्र असो किंवा क्रीडा क्षेत्र ज्याला अनुभवी प्रशिक्षक लाभतो त्याचे भविष्य नक्कीच आकार घेते, असे प्रतिपादन तायक्वांदो असोसिएशनचे जिल्हा सचिव घनश्याम सानप यांनी केले.

नुकत्याच विदिशा मध्य प्रदेश येथे झालेल्या शालेय राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत एकलव्य तायक्वांदो अकॅडमीच्या खेळाडूंनी नेत्रदिपक कामगिरी करत पदकांची कमाई केली या यशाबद्दल विजेत्या खेळाडूंचा एकलव्य तायक्वांदो अकॅडमीच्या वतीने गौरव करण्यात आला त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमास एकलव्य तायक्वांदो असोसिएशनचे संस्थापक गणेश वंजारी, ग्रँडमास्टर अल्ताफ खान, प्रशिक्षक योगेश बिचितकर, सचिन मरकड, मंगेश आहेर व खेळाडूंचे पालक उपस्थित होते.

श्री. सानप सर म्हणाले की सुवर्णपदकाचा मानकरी थानोज साईरेड्डी किसरा कांस्यपदाचा मानकरी विराज पिसाळ तसेच शालेय राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत सहभागी खेळाडू आदिती धावड यांनी अत्यंत उत्कृष्ट कामगिरी करत जिल्ह्याचे नाव मोठे केले आहे माझ्याकडून व जिल्हा असोसिएशन कडून त्यांचे खूप खूप अभिनंदन व भावी वाटचालीस शुभेच्छा देतो येणाऱ्या काळात असेच आपल्या जिल्ह्याचे नाव त्यांनी मोठे करावे असे त्यांनी सांगितले

या यशाबद्दल तायक्वांदो स्पोर्टस् असोसिएशनचे अध्यक्ष माणिकराव विधाते तसेच एकलव्य तायक्वांदो अॅकॅडमीचे अध्यक्ष दिलीप सातपुते तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष संदीप ओंबासे, महासचिव गफ्फार पठाण, खजिनदार प्रसाद कुलकर्णी, सोनाली काळे यांनी खेळाडूंना विशेष शुभेच्छा देत भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. आभार अल्ताफ खान यांनी मानले.

# दिनदुबळ्यांची सेवा हीच खरी मानवता

### चंद्रकांत मुथा यांचे प्रतिपादन



जैन वात्सल्य संस्थेतर्फे गरजूंना किराणा व अन्नधान्य वाटप करताना चंद्रकांत मुथा (वांबोरकर). समवेत सुभाष मुथा, विनोद मुथा आदी.

## जैन वात्सल्य संस्थातर्फे गरजूंना किराणा व अन्नधान्य वाटप

नगर – मनुष्य जीवनात परोपकार अतिशय महत्त्वाचा असतो. भारतीय संस्कृती इतरांना अडचणीत मदत करण्याची शिकवण देते. साधूसंतही नेहमी दिनदुबळ्यांची सेवा हीच खरी मानवता असल्याचे सांगतात. याच शिकवणुकीतून जैन वात्सल्य संस्था गरजूंना किराणा देऊन मोठे सामाजिक कार्य करीत आहे. परमेश्वराच्या कृपेने आपल्याला सर्व काही प्राप्त होते. अशावेळी आपण कर्तव्य भावनेने समाजासाठी योगदान दिले पाहिजे. समाजऋणातून उतराई होण्याच्या उपक्रमामुळे खऱ्या अर्थाने गरजूंना दिलासा मिळत आहे. या कार्यात सहभागी होणे पुण्यकर्म असल्याचे मनोगत चंद्रकांत मुथा (वांबोरीकर) यांनी व्यक्त केले.

जैन ओसवाल वात्सल्य संस्थेमार्फत दर महिन्याप्रमाणे गरजू कुटुंबांना महिनाभराचा किराणा व अन्नधान्य वाटप चंद्रकांत मुथा यांच्या हस्ते करण्यात आले. चंद्रकांत मुथा परिवाराने पुढील पाच वर्षांसाठी या उपक्रमासाठी मदत केली आहे. धार्मिक परीक्षा बोर्ड समोरील अशोक कोठारी यांच्या बंगल्यावर हा कार्यक्रम झाला.

याप्रसंगी विनोद मुथा, आशिष मुथा, आकांक्षा मुथा, चेहक मुथा, अशोक बोरा (श्रीगोंदा), अशोक कोठारी, संस्थेचे अध्यक्ष अजित बोरा, उपाध्यक्ष सुभाष मुथा, सेक्रेटरी विजय गुगळे, अशोक (बाबूशेठ) बोरा, विजय गुंदेचा आदी उपस्थित होते. प्रास्ताविक अशोक (बाबुशेठ) बोरा यांनी केले. अजित बोरा यांनी संस्थेची माहीती दिली.

सुभाष मुथा म्हणाले की, संस्थेच्या माध्यमातून मानव सेवेचे व्रत जोपासले जात आहे. जैन मंदिर साधर्मी ट्रस्टच्या माध्यमातून औषधोपचार मदती करिताही गरजवंतांनी आपल्याशी संपर्क साधावा. जैन वात्सल्य संस्था ही अत्यंत चिकाटीने सहधर्मीयांना महिनाभर पुरेल इतके किराणा वाटप करत आहे.

समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी संस्था अविरत कार्य करीत आहे. या समाज कार्यात अनेक दानशूर व्यक्तींचा हातभार लागत आहे. त्यामुळे हे कार्य अखंडपणे चालू ठेवण्यासाठी प्रोत्साहन मिळते. आपण समाजामुळे मोठे होतो. त्यामुळे समाज ऋणातून उतराई होण्यासाठी योगदान दिले पाहिजे. चांगल्या कामासाठी दिलेल्या मदतीचा योग्य विनियोग झाला पाहिजे. चंद्रकांत मुथा यांनी पुढच्या पाच वर्षांसाठी या उपक्रमासाठी मदत देऊन आदर्श निर्माण केला आहे, असे सुभाष मुथा यांनी सांगितले. सेक्रेटरी विजय गुगळे यांनी आभार मानले.


महर्षी ग. ज. चितांबर विद्यालयात क्रीडा सप्ताहाचे क्रीडा ध्वज फडकावून क्रीडा ज्योत प्रज्वलित करुन उद्घाटन करताना जिल्हा कारागृह अधीक्षक संतोष कवार. समवेत तुरुंगाधिकारी सुनील वानखडे आदी.

## खेळाच्या माध्यमातून स्वतःचा विकास साधावा

### संतोष कवार यांचे प्रतिपादन; चितांबर विद्यालयात क्रीडा सप्ताहाचे उत्साहात उद्घाटन

नगर – विद्यार्थ्यांनी खेळाच्या माध्यमातून स्वतःचा विकास साधावा आणि भविष्यात उज्ज्वल यश संपादन करावे असे प्रतिपादन जिल्हा कारागृह अधीक्षक संतोष कवार यांनी केले. येथील महर्षी ग. ज. चितांबर विद्या मंदिर प्रशालेत वार्षिक क्रीडा सप्ताहाचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. प्रमुख अतिथी म्हणून तुरुंगाधिकारी सुनील वानखडे उपस्थित होते.

यावेळी क्रीडा ध्वज फडकावून क्रीडा ज्योतीचे प्रज्वलन केले. तसेच त्यांच्या हस्ते विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. क्रीडा सप्ताहाचे औपचारिक उद्घाटन पाहुण्यांच्या हस्ते इयत्ता पाचवी अ विरुद्ध ब यांच्यातील लंगडी सामन्याच्या उद्घाटनाने झाले.

यावेळी व्यासपीठावर विद्यालयाच्या प्राचार्या सौ. विभावरी रोकडे, पर्यवेक्षिका मंदा शिंदे, शिक्षक प्रतिनिधी विनोद गाडगे, संमेलन कार्यवाह अंजली हरिश्चंद्रे, मंजुषा जोशी आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थिनींच्या ईशस्तवन व स्वागतगीताने झाली. प्राचार्या सौ. विभावरी रोकडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत केले. गणेश उघडे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. क्रीडा शिक्षिका सौ. मंजुषा जोशी यांनी क्रीडा विभागाचा अहवाल सादर केला. स्वयंशासन मंडळाची प्रतिनिधी कु. विद्या बुलाखे हिने विद्यार्थ्यांना खिलाडू वृत्ती जोपासण्याची प्रतिज्ञा दिली. सौ. योगिता चंद्रात्रे यांनी सूत्रसंचालन केले तर सचिन कोटमे यांनी आभार प्रदर्शन केले.




नगरचा ऐतिहासिक भुईकोट किल्ल्याच्या बुरुजांची राजा शिवछत्रपती परिवार व स्नेहबंध सोशल फौंडेशनने स्वच्छता केली. दुसऱ्या छायाचित्रात किल्ल्याच्या परिसरात स्वच्छता राबविताना डॉ. उद्धव शिंदे तसेच इतर कार्यकर्ते.

# ऐतिहासिक भुईकोट किल्ल्यातील बुरुजांनी घेतला मोकळा श्वास

**राजा शिवछत्रपती परिवार व स्नेहबंध सोशल फाउंडेशनने राबवली स्वच्छता मोहीम**

नगर – राजा शिवछत्रपती परिवार व स्नेहबंध सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ऐतिहासिक भुईकोट किल्ल्यात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या स्वच्छते मोहिमेमुळे झाडाझुडपात आणि प्लास्टिकच्या विळख्यात अडकलेल्या किल्ल्यातील बुरुजांनी मोकळा श्वास घेतला.

स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करुन स्वच्छता मोहिमेला सुरुवात झाली. या मोहिमेत ४० जण सहभागी झाले होते.

या मोहिमेत टुरिष्ट गाईड अमोल बास्कर, प्रवीण मोहरकर, प्रविण झरेकर आदी सहभागी झाले होते. किल्ल्यातील बुरुजांवर उगवलेली झुडपे मुळासकट उपटून काढल्यामुळे त्यांचे आयुष्यमान वाढण्यास मदत होणार आहे. तसेच या बुरुजांवर जाण्यासाठीच्या रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात काटेरी झुडूपे वाढली होती. ती काढून टाकली. या स्वच्छता मोहिमेदरम्यान प्लास्टिकच्या बाटल्या व प्लास्टीक कचराही गोळा करण्यात आला. सकाळी ८ वाजता सुरू झालेली ही स्वच्छता मोहीम दुपारी दीड वाजेपर्यंत सुरू होती.

### किल्ल्यात नजरेस पडेल तो कचरा गोळा करावा

या ऐतिहासिक भुईकोट किल्ल्यात येणाऱ्या प्रत्येकाने आपल्या नजरेस पडेल तो कचरा गोळा करावा जेणेकरून किल्ला स्वच्छ राहील. त्यामुळे बाहेरून येणाऱ्या पर्यटक येथील स्वच्छतेचा आदर्श आपल्या सोबत घेऊन जातील. किल्ल्यात येणाऱ्यांनी आपल्या सोबतच्या पाणी पिण्याच्या बाटल्या सोबतच घेऊन जाव्यात जेणेकरून कचरा होणार नाही, असे आवाहन डॉ. उद्धव शिंदे यांनी केले.

# राज्य रोड सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धा अहिल्यानगर शहरात प्रथमच होणार




नगर – सायकलिंगचे शहर अशी ओळख प्राप्त करत असलेल्या अहिल्यानगर शहरात सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (कॅम) यांच्या मान्यतेने आणि अहमदनगर सायकलिंग क्लबच्या सहकार्याने सायकलिंग असोसिएशन ऑफ अहमदनगर प्रथमच अहिल्यानगरीमध्ये ५व्या महाराष्ट्र राज्य रोड सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन २५ आणि २६ नोव्हेंबर दरम्यान करत आहे. पाथर्डी–अहिल्यानगर मार्गावरील चांदबीबी महाल बायपास लिंक रोडवर (चांदबीबी महाल ते वाळुंज) सुमारे १० किमी मार्गावर या स्पर्धा रंगणार आहेत.

या स्पर्धेमधून पुरी (ओरिसा) येथे ७ ते १० डिसेंबर दरम्यान होत असलेल्या २९व्या राष्ट्रीय रोड सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्याचा संघ निवडण्यात येणार आहे.

या ५ व्या महाराष्ट्र राज्य राज्य रोड सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धा युथ (१२ ते १४ वर्षे), सब ज्युनिअर (१५ आणि १६ वर्षे), ज्युनिअर (१७ आणि १८ वर्षे) या वयोगट मुले आणि मुलींसाठी तसेच ईलीट पुरुष व महिला (१९ वर्ष आणि त्यापुढील) आणि २३ वर्षाखालील पुरुष (मेन अंडर२३ वयोगट) अशा एकूण नऊ वयोगटात होतील. इंडीव्युजल टाईम ट्रायल आणि मास स्टार्ट / रोड रेस अशा दोन प्रकारात स्पर्धक आपले कसब पणाला लावतील.

या राज्य आणि राष्ट्रीय रोड सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धेमधून खेळाडू नोकऱ्यांसाठी पात्र ठरत असतात, शासनाच्या इतर सर्व सवलती केवळ या स्पर्धेमधील कामगिरीवरुनच सायकलपटूंना मिळत असतात, नोकऱ्या असणाऱ्या खेळाडूंना बढती / पगारवाढ या स्पर्धेमधील कामगिरीवरुन ठरत असते म्हणून सायकलपटूंच्या दृष्टीने या स्पर्धा अत्यंत महत्वपूर्ण आहेत.

सूर्या थात्तू, प्रणव कांबळे, मानसी महाजन, मणाली रत्नोजी, आभा सोमण (सर्व पुणे), तेजस धांडे (नागपूर), प्राजक्ता सुर्यवंशी, येगेश्वरी कदम (दोघी सांगली), मुस्तफा पत्रावाला (मुंबई), आकांक्षा म्हेत्रे (जळगांव), प्रणीता सोमण, राज कारंडे, अपूर्वा गोरे (अहिल्यानगर), पूजा दाणोले (कोल्हापूर), अदिती डोंगरे, वीरेंद्रसिंह पाटील, हरीश डोंबाळे, समरजीत थोरबोले, ऋतिका शेजुळ (सर्व पुणे क्रीडा प्रबोधिनी) आदी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सायकलपटूंनी या स्पर्धेत आपला सहभाग निश्चित केला आहे.

स्पर्धेच्या आयोजनासाठी गौरव फिरोदीया यांच्या अध्यक्षतेखाली सीएफआयचे उपाध्यक्ष प्रताप जाधव, कॅमचे सचिव प्रा. संजय साठे, अहमदनगर जिल्हा संघटनेचे अध्यक्ष प्रा. साईनाथ थोरात, कॅमचे खजिनदार भिकन अंबे, मेहेर तिवारी यांची समिती काम करत असून तांत्रिक जबाबदारी आंतरराष्ट्रीय पंच सुदाम रोकडे, धरमेंदर लांबा आणि श्रीमती दीपाली पाटील सांभाळत आहेत.

# महिलेवर अत्याचार करून अल्पवयीन मुलीचीही छेडछाड

**आरोपीवर अत्याचार, पोक्सो, ॲमट्रॉसिटी कलमानुसार गुन्हा दाखल**

नगर – महिलेवर वारंवार अत्याचार करून तिच्या अल्पवयीन मुलीशी अश्लिल चाळे केले. तसेच त्यांना 'गझवा–ए– हिंद' करण्याची धमकी दिली असल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी पीडित महिलेने गुरूवारी (दि.२१) भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अत्याचार, विनयभंग, पोक्सो, ॲट्रॉसिटी आदी कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अस्लम बुऱ्हारण सय्यद (रा. दौलावडगाव, ता. आष्टी, जि. बीड) असे गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपीचे नाव आहे. सदरची घटना १४ जुलै २०१४ ते १३ नोव्हेंबर २०२४ दरम्यान घडली असून गुन्हा २१ नोव्हेंबर २०२४ रोजी दाखल झाला आहे. फिर्यादी त्यांच्या कुटुंबासह अहिल्यानगर शहरात राहतात. अस्लमने वेळोवेळी फिर्यादीच्या घरी जावून त्यांच्या इच्छेविरूध्द बळजबरीने अत्याचारही केला. फिर्यादी यांनी नकार दिल्यास, 'मी तुला व तुझ्या मुलांना मारून टाकीन' अशी धमकी दिली. जातीवाचक बोलून तुम्हाला गुलाम बनवून तुमचा 'गझवा–ए–हिंद' करायचा आहे असे म्हणाला. २१ नोव्हेंबरच्या पूर्वी सुमारे पंधरा दिवस आधी फिर्यादी कामावर गेलेल्या असताना अस्लम त्यांच्या घरी गेला. फिर्यादीच्या अल्पवयीन मुलीला (वय १३) घरात एकटी पाहुन तिच्याशी अश्लिरल चाळे करून लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.

दरम्यान, फिर्यादी यांनी भिंगार कॅम्प पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी फिर्याद नोंदवून घेत अस्लम विरोधात गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलीस उपअधीक्षक (नगर शहर) अमोल भारती करत आहेत.

# नवनागापूरला उमेद सोशल फाऊंडेशनचा बालदिन साजरा

**अभिनेते सयाजी शिंदे यांची उपस्थिती**

नगर – उमेद सोशल फाऊंडेशनच्या वतीने नवनागापूर येथील साईराजनगरला मुलांसह बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला. या बालदिनासाठी प्रसिध्द अभिनेते सयाजी शिंदे यांनी बालकांसह केक कापला. विविध कार्यक्रमाद्वारे बालकांनी धमाल करुन कार्यक्रमाचा आनंद लुटला. यावेळी परिसरातील बालके उपस्थित होते.



नवनागापूरला उमेद सोशल फौंडेशन तर्फे बालदिनाच्या कार्यक्रम प्रसंगी अभिनेते सयाजी शिंदे. समवेत नवनागापूर ग्रा.पं. सदस्य आप्पासाहेब सप्रे आदी.

या बालदिनाच्या कार्यक्रमासाठी नवनागापूर ग्रामपंचायत सदस्य अप्पासाहेब सप्रे, सागर सप्रे, नरेश शेळके, संजय भोर, उमेद सोशल फाऊंडेशनचे अध्यक्ष अनिल साळवे, सचिव सचिन साळवी, सल्लागार दीपक धिवर, सदस्य विजय लोंढे, रवी सुरेकर, रवी साखरे, प्रकाश भालेराव, संभाजी वायकर, सचिन मगर, अक्षय पाटील, सचिन गर्जे, प्रवीण ननवरे, विश्वास भोसले, हरिभाऊ दानवे, संदीप बनसोडे, विवेक पाटेकर आदींसह नागरिक उपस्थित होते.

अभिनेते सयाजी शिंदे म्हणाले की, आजच्या बालकांमधून उद्याच्या सक्षम भारताचे भवितव्य घडणार आहे. बालकांच्या हक्काच्या संरक्षणासाठी नागरिकांनी जबाबदारीची भूमिका घ्यावी. बालकांना सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी सर्वांच्या योगदानाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

फाऊंडेशनचे अध्यक्ष अनिल साळवे यांनी पाहुण्यांचे स्वागत करुन संस्थेच्या माध्यमातून महिला, बालकांसाठी राबविण्यात येणाऱ्या सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. यावेळी मुलांना चॉकलेट व अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी पोवाडे, भाषण सादर करुन कार्यक्रमात रंगत आणली.

सूत्रसंचालन संभाजी वायकर यांनी केले. आभार सचिन साळवी यांनी मानले.

# वेतन लेखा कार्यालयात स्पर्श संबंधी मेळावा

नगर – आपण सर्व एकाच परिवाराचा भाग असून सर्वानी सोबत राहून काम करणे आवश्यक आहे. पेन्शनर्सचे सर्व थकीत पेमेंट वेळेवर होणे आवश्यक असते यासाठी वेतन लेखा कार्यालय कटिबद्ध आहे. या कार्यालयाचे कार्य अत्यंत उत्कृष्ठ आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून देण्यात आलेल्या सेवेचा सर्व पेन्शनर्सने लाभ घ्यावा, असे आवाहन एम आय सी अँड एस चे प्रमुख ब्रिगेडियर रसूल डिसुजा यांनी केले.



वेतन लेखा कार्यालयातील स्पर्श संबंधी मेळाव्याचे उद्घाटन करताना एम आय सी एन्ड एस चे प्रमुख ब्रिगेडिअर रसूल डिसूजा. समवेत वेतन लेखा कार्यालय प्रमुख रक्षा लेखा सहायक नियंत्रक विकास मोहरीर (एमआयआर), व्ही. पांडुरंगा (एसीआर) आदी. (छाया – मंदार फ़ोटोज)

अहिल्यानगर येथील एसबीआय चौकातील संरक्षण खात्याच्या वेतन लेखा कार्यालयात पेन्शनर कर्मचाऱ्यांसाठी स्पर्श व डिजिटल जीवन प्रमाणपत्र या बाबत जागृती व्हावी यासाठी पुणे येथील रक्षा लेखा प्रधान नियंत्रक (सेना ) यांच्या मार्गदर्शनानुसार आयोजित एक दिवसीय मेळावा पार पडला.

या मेळाव्याचे उद्घाटन प्रमुख पाहुणे म्हणून एम आय सी अँड एस चे प्रमुख ब्रिगेडियर रसूल डिसुजा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वेतन लेखा कार्यालयाचे एमआयआर विभागाचे प्रमुख रक्षा लेखा सहायक नियंत्रक (भा.र.ले.से.) विकास मोहरीर तसेच एसीआर विभागाचे प्रमुख क्षा लेखा सहायक नियंत्रक (भा.र.ले.से.) व्ही. पांडुरंगा,वरिष्ठ लेखा अधिकारी दीपेंद्र कुमार, अर्मड कोअर सेंटरचे कर्नल संजयकुमार महापात्रा, एम आय सी अँड एस चे लेफ्टनंट कर्नल ओ पी पाठक आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विकास मोहरीर हे होते.

अध्यक्ष स्थानावरून बोलताना मोहरीर यांनी स्पर्श ही तांत्रिकदृष्ट्या सक्षम व उत्कृष्ट पद्धती असून आतापर्यंत ३२ लाख पेन्शनर्स पैकी ३० लाख पेन्शनर्सची माहिती यामध्ये समाविष्ट झाली आहे. यात आपण घरी बसूनही मोबाईलद्वारे प्रमाणीकरण करू शकता. हा कार्यक्रम जरी एक दिवसाचा असला तरी या कार्यालयात स्पर्श सेवा केंद्र कार्यालयीन वेळेत कायम सुरु आहे असेही त्यांनी सांगितले. यावेळी कर्नल संजय कुमार तसेच ले. कर्नल पाठक यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वरिष्ठ लेखा अधिकारी अशोक कुमार दास यांनी तर आभार संतलाल सिंह यांनी मानले. या मेळाव्यात जवळपास उपस्थित २०० पेन्शनर्सच्या समस्यांचे निराकरण करण्यात आले.

# आर्ट ऑफ लिविंगतर्फे २६ नोव्हेंबर ते १ डिसेंबर हॅपिनेस प्रोग्रॅम (आनंद अनुभूती शिबिर)

नगर – श्री श्री रविशंकरजी यांच्या आर्ट ऑफ लिविंग या संस्थेतर्फे २६ नोव्हेंबर ते १ डिसेंबर या कालावधीत सकाळी ६.३० ते ९ या वेळेत हॅपिनेस प्रोग्रॅम (आनंद अनुभूती शिबिर) हे होत आहे. या शिबिरामध्ये योग प्राणायाम ध्यान व त्याचबरोबर शिबिराचे मुख्य आकर्षण सुदर्शन क्रिया शिकवले जाणार आहे. नगरकरांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

शिबिर हे नगर शहरात लक्ष्मी कारंजा चौक, नवकमल निवास येथे होणार असून नावनोंदणी साठी ८०८०९६७०७०

# अहमदनगर होमिओपॅथिक कॉलेज व हॉस्पिटलतर्फे २५ ते ३० नोव्हेंबर संधीवात तपासणी व उपचार शिबीर

नगर – अहमदनगर होमिओपॅथीक शिक्षण संस्थेचे अहमदनगर होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल सावेडी रोड, नगर येथे २५ ते ३० नोव्हेंबर पर्यंत सकाळी ९.३० ते सायं.५.०० या वेळेत संधीवात या विकारांवर मोफत तपासणी व उपचार शिबीराचे आयोजन केले असल्याची माहिती प्राचार्य व रुग्णालयीन अधिक्षक डॉ. सुनिल पवार यांनी दिली.

या शिबीरामध्ये संधीवात या विकारांवर सखोल चिकित्सा करुन आजार बरा होईपर्यंत दर आठ दिवसाला मोफत औषधे दिली जातील.शिबीरातंर्गत सर्व रुग्णांची मोफत तपासणी प्राचार्य डॉ. सुनिल पवार, डॉ. कैलास परदेशी, हे करणार असुन आजार बरा होईपर्यंत सर्वांना मोफत होमिओपॅथीक औषधे देण्यात येतील. तसेच गरजेनुसार ईसीजी, रक्त, लघवी व सोनोग्राफी व एक्स रे ची तपासणी करुन, या तपासण्यांवर ३० टक्के सवलत दिली जाईल.

नगर व नगर परिसरातील सर्व गरजु व्यक्तींनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष डॉ. भुषण अनभुले, उपाध्यक्ष भुषण चंगेडे, खजिनदार डॉ. विलास बी सोनवणे, सचिव डॉ. डी. एस. पवार, सहसचिव लक्ष्मीनिवास सारडा, संचालक बोरा आर. एस., अभय मुथ्था, शिवाजी रणसिंग, डॉ. समीर होळकर, राजेंद्र मेहेत्रे, डॉ. ऋतुजा चव्हाण तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनिल पवार यांनी केले आहे.

# पुणे विभाग शालेय कुराश स्पर्धेत सिद्धी दातरंगे हिला सुवर्णपदक



नगर – नुकत्याच इंदापूर येथे पार पडलेल्या पुणे विभागीय शालेय कुराश स्पर्धेत सिद्धी अशोक दातरंगे हिने ५२ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले. तिची पुणे येथे राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

सिद्धी दातरंगे ही भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल मध्ये इयत्ता सातवी मध्ये शिकत असून ती यंग मेन्स जुडो क्लब सिद्धी बागची खेळाडू आहे. तिला राष्ट्रीय किर्तीचे मार्गदर्शक प्रा. संजय धोपावकर, आंतरराष्ट्रीय खेळाडू आदित्य धोपावकर, शालेय खेळ शिक्षक कैलास करपे व सुनील गायकवाड, तसेच राष्ट्रीय खेळाडू पै.गणेश लांडगे, पै.शुभम दातरंगे, अथर्व नरसाळे, गणेश शिंदे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल तिचे पर्जन्येश्वर मित्र मंडळ, श्री एकदंत मित्र मंडळ, दातरंगे मळा मंडळाच्या वतीने तिचे सत्कार करण्यात आले. तसेच अमोल गाजेंगी, अक्षय दातरंगे, आकाश दातरंगे, आनंद दातरंगे, दत्ता दातरंगे, अमोल दातरंगे, मनसेचे वाहतूक शहराध्यक्ष अशोक दातरंगे व शिवसेनेचे उपशहर प्रमुख संदीप दातरंगे यांनी अभिनंदन केले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,–

माझी सुन सना जिशान सय्यद रा. घर नं. ए–७, वाबळे कॉलनी, फकीरवाडा अहमदनगर येथे मी व माझी पत्नी मुलगा व सुन असे एकत्रात माझ्या स्वतःचे घर नं. ए– ७, वाबळे कॉलनी, फकीरवाडा अहमदनगर येथील घरात रहात होतो. परंतु माझा मुलगा जिशान व सुन सना यांचेमध्ये सतत घरगुती कारणावरुन भांडण तंटा होत असे. दोघांचे भांडणे चालु असतांना माझी सुन मला व माझ्या पत्नीला पोलीस केस करण्याबाबत धमकी देत असे, तसेच माझी सुन तिचे वडील व बहीणीला बोलावुन घेत असे व मला व माझ्या पत्नीस धमकी देत असते की, मी तुमचेवर खोटा गुन्हा दाखल करुन तुम्हाला जेलमध्ये पाठविल, अशी धमकी मला व माझ्या पत्नीस देत असे. मी व माझ्या पत्नीने समजावुन सांगण्याचा अनेक वेळा प्रयत्न केला परंतु माझी सुन ऐकण्याचे मनस्थितीत नाही. मी व माझ्या पत्नीने सुनेस कुठल्याही प्रकारचा त्रास कधीही दिलेला नव्हता व नाही. असे असतांना आमची सुन मला व माझ्या पत्नीस खोटया केसमध्ये गुंतविण्याची धमकी देत असल्यामुळे मी व माझी पत्नी आम्ही आमचे स्वतः चे मुलगा व सुन रहात असलेले घर सुमारे एक महिन्यापुर्वी सोडुन त्यांचेपासुन विभक्त गौरवनगर, मुकुंदनगर अहमदनगर येथे भाड्याचे घर घेवुन सुनापासुन विभक्त रहात आहोत. आता आमचा सुन सना हीचेशी काहीएक संबध राहीलेला नाही. माझ्या सुनेने आमचे विरुध्द खोट्या नाट्या तक्रारी केल्यास सदर तक्रारीची पुर्ण चौकशी केल्याशिवाय दखल घेण्यात येवु नये करीता सदरची नोटीस प्रसिध्द केली असे. कळावे

अहमदनगर
दिनांक २१ /११/२०२४

नोटीस देणार
**आरीफ काझम सय्यद**
रा. गौरवनगर, मुकुंदनगर
अहमदनगर. मो. नं. ९२८४२१७६९०



Telegram : 'MEHERBABAD' Ahmednagar. Telephone No (0241 ) 2343606/2324947 Ahmednagar Office
234709372341821 Ahmednagar Office
2340666 Ahmednagar Office (Fax Line)
2548777/2548499 Meherabad Trust Office
2548733/2548736 Pilgrim Registration Office
2548211 Meher Pilgrim Retreat

**AVATAR MEHER BABA PERPETUAL PUBLIC CHARITABLE TRUST**

Post Bag No. 31, King's Road, Ahmednagar 414001, Maharashtra State, INDIA
REGD. NO. E-150-A UNDER THE BOMBAY PUBLIC TRUSTS ACT, 1930
Registered Under Section 12 - A of Income Tax Act, 1961 No. CH-P-ANGR-1487-75-76
80-G Certificate issued by the Commissioner Income Tax, Pune
Regd. No. 083720042 Under Foreign Contribution (Regulation) Act, 1976 PAN AAATA 3271 B

Shri Framroze Mistry
Chairman

MEHERABAD
दि. १०.१०.२०२४

प्रति,
सेविका सुनिता अंकुश शेंडगे
मु. पो. अरणगांव मेहेराबाद
ता. जि. अहमदनगर

**विषय : कामावरून कमी करण्याचा आदेश**

महोदया,

तुम्ही आमच्या संस्थेमध्ये शेतकी विभागात कामास होता. आपण दि. १३.१२.२०२३ पासून पुर्व सुचना अथवा लेखी अर्ज अथवा रजा मागणीचा अर्ज न देता कामावरून अनाधिकृतपणे गैरहजर आहात . त्यामुळे आपणास दि ..४.१. २०२४ रोजी कामावर त्वरित हजर होण्यास लेखी नोटीस पाठवली. परंतु सदरची नोटीस आपण राहत्या घरी नसल्याने परत आले आहे. तदनंतर दि.२०.२.२०२४ रोजी आपल्या पत्यावर दुसरीही पत्र पाठविले व कामावर हजर होण्यास सांगीतले. परंतु सदरचे पत्र देखील पुन्हा परत आलेले आहे. पुढे जाऊन वादास जागा राहू नये म्हणुन व्यवस्थापनाने आपणास दि. ६.६.२०२४ रोजी आपल्या अधिकृत व्हॉटस्अ‍ॅप नंबरवर पुन्हा नोटीस पाठवली व आपल्या अनाधिकृत गैरहजेरीचा खुलासा मागवला. परंतु आपण आजपर्यंत खुलासा ही केला नाही किंवा कामावर ही हजर झाला नाहीत. या सर्व बाबी लक्षात घेता तुम्हास नोकरी करण्याची इच्छा दिसून येत नाही व आपण आपल्या नोकरीचा स्वतःहून त्याग केलेला आहे असे स्पष्टपणे दिसून येते.

त्यामुळे तुम्हास दिनांक ०१. १०. २०२४ पासून संस्थेच्या सेवेतून कायम स्वरूपी कमी करण्यात येत आहे . तुम्हास नोटीस ऐवजी एक महिना पगाराची रक्कम रूपये १३,३०६/– चेक क्रमांक ३२९५०९ अन्नवये सोबत अदा करण्यात येत आहे. कळावे.

टिप :– आपण दि . १३ . १२ . २०२३ पासून अनाधिकृत गैरहजर असल्याने आपण आपल्या राहत्या घरी आहात किंवा नाही. अथवा कोठे राहता हे ही व्यवस्थापनास कळवले नसल्यामुळे सदरचा आदेश व्यवस्थापनाकडे असलेले आपल्या अधिकृत पत्यावर पाठवलेला आहे.

**रमेश जंगले**
(विश्वस्त)
अवतार मेहेर बाबा पी.पी.सी. ट्रस्ट

## जाहीर नोटीस

श्रीमती सुनिता अंकुश शेंडगे ही सेविका अवतार मेहेर बाबा ट्रस्ट मध्ये दि.०१.१२.२०१६ पासून कामावर होत्या. दि. १३.१२.२०२३ पासून कोणतीही पुर्वसुचना न देता कामावर गैरहजर असल्यामुळे त्यांना वेळोवेळी पत्राव्दारे व त्यांच्या व्हॉटस्अ‍ॅप नंबरव्दारे कळविण्यात आलेले आहे. परंतु त्यांनी आजपर्यंत खुलासा न केल्यामुळे सुनिता शेंडगे यांना दि. ०१.१०. २०२४ पासून कामावरून कमी करण्यात येत आहे.





# डिहायड्रेशन टाळण्यासाठी...

वजन कमी करण्यासाठी शरीरातला ओलावा टिकवून ठेवणं गरजेचं असतं. त्यातच उन्हाळ्यात अधिक घाम येत असल्याने द्रव पदार्थांचं प्रमाण वाढवावं लागतं. पाण्यासोबतच शरीराला थंडावा देणाऱ्या म्हणजे पाण्याचं प्रमाण जास्त असणाऱ्या फळं आणि भाज्यांचं सेवन करणंही गरजेचं आहे. उन्हाळ्यात डिहायड्रेशन टाळण्यासाठी कोणत्या पदार्थांचं सेवन करायला हवं याविषयी...

✻ कलिंगडामध्ये भरपूर पोषक घटक असतात. त्यातच कॅलरी कमी आणि पाण्याचं प्रमाण जास्त असल्यामुळे वजन कमी करणाऱ्यांनी कलिंगड खायला हवं. हृदयाच्या आरोग्याच्या दृष्टीनेही कलिंगड चांगलं असतं.

✻ स्ट्रॉबेरीत अर्ध्यापेक्षा जास्त पाणी असतं. फायबर आणि 'क' जीवनसत्त्वाचं मुबलक प्रमाण असणाऱ्या स्ट्रॉबेरीचंही सेवन करता येईल.

✻ 'क' जीवनसत्त्वाने युक्त संत्री उन्हाळ्यात



शरीरातला ओलावा टिकवून ठेवतात. यामुळे रक्तातल्या साखरेचं प्रमाण नियंत्रणात रहातं. कोलेस्टरॉलची पातळी कमी करण्यासाठी संत्री खायला हवीत.

**काय खाल?**

✻ उन्हाळ्यात काकडी खा. काकडी पाण्यापासून बनलेली असल्याने बरेच लाभ होतात. फ्री रॅडिकल्समुळे होणारं शरीराचं नुकसान भरून काढण्याची क्षमता काकडीमध्ये असते.


✻ एक कप लेट्यूसमधून शरीराला जवळपास पाव कप पाणी मिळतं. लो कार्ब सँडविचमध्ये लेट्यूस घालून खाता येईल. सॅलेडमध्येही त्याचा समावेश करता येईल.

✻ उन्हाळ्यात भोपळ्या मिरचीचं सेवन करायला हवं. ही शरीराला थंडावा देणारी भाजी आहे. यात बरेच पोषक घटक आणि जीवनसत्त्वं असतात. वजन कमी करणाऱ्यांनी या भाजीचा आहारात समावेश करायला हवा.

# ब्रॉट्युलिझमविषयी

**व्याधी विचार**

ब्रॉट्युलिझम हा अत्यंत गंभीर असा आजार आहे. यात रुग्णाला अर्धांगवायूचा झटका येतो. एका विषारी घटकामुळे ही समस्या निर्माण होते. क्लॉस्ट्रिडियम बॉटूलिनम नामक बॅक्टेरियामुळे हा आजार होतो. हे बॅक्टेरिया उघड्या जखमेतून किंवा अर्धवट शिजवलेल्या, साठवून ठेवलेल्या अन्नातून मानवी शरीरात शिरतात. क्लॉस्ट्रिडियम जगभरात आढळतात. मातीत तसंच दूषित पाण्यात त्यांचा वावर असतो. या बॅक्टेरियांची अंडी योग्य पद्धतीने न साठवलेल्या अन्नात वाढतात. हे बॅक्टेरिया विषारी घटकांची निर्मिती करतात. हे दूषित अन्न खाल्यानंतर माणसाला विषबाधा होते. भाज्या, मांस आणि न शिजवलेल्या माशांमध्ये हे बॅक्टेरिया आढळू शकतात. मधातही त्यांचा वास असू शकतो. उघड्या जखमेत शिरलेल्या बॅक्टेरियांनी विषारी घटकांची निर्मिती केली तरी ब्रॉट्युलिझम जडू शकतो. या विकाराचे तीन प्रकार आहेत. त्यात अन्नातून होणारा ब्रॉट्युलिझम, जखमेतून होणारा ब्रॉट्युलिझम आणि इन्फंट ब्रॉट्युलिझम यांचा समावेश होतो. पहिल्या दोन प्रकारांची माहिती वर नमूद करण्यात आली आहे. क्लॉस्ट्रिडियमची अंडी शरीरात गेल्यानंतर निर्माण होणाऱ्या समस्येला इन्फंट ब्रॉट्युलिझम



म्हणतात. ही अंडी माणसाच्या आतड्यात वाढतात आणि विषारी घटकांची निर्मिती करतात. मधात ही अंडी असू शकतात. अशुद्ध मधाच्या सेवनाने इन्फंट ब्रॉट्युलिझम होऊ शकतो.

ब्रॉट्युलिझम कोणत्याही प्रकारचा असला तरी तो जीवघेणा ठरू शकतो. त्यामुळे रुग्णाला तातडीने उपचार मिळणं गरजेचं आहे. अन्नामार्फत होणारा हा विकार अधिक धोकादायक ठरू शकतो. कारण एकाच वेळी अनेकांच्या शरीरात हा घातक बॅक्टेरिया प्रवेश करू शकतो. या विकाराच्या लक्षणांबद्दल बोलायचं तर गिळायला आणि बोलायला त्रास होणं ही याची प्रमुख लक्षणं आहेत. यासोबत मळमळणं, उलट्या, ओटीपोटात गोळे येणं, तोंड कोरडं पडणं, दुहेरी दिसणं, श्वास घ्यायला त्रास होणं अशी लक्षणं दिसून येतात. हे बॅक्टेरिया शरीरात गेल्यानंतर साधारण आठ ते ३६ तासांमध्ये ही लक्षणं दिसायला सुरूवात होते. काही प्रकरणांमध्ये सहा तासांनीही लक्षणं दिसू लागतात तर कधी दहा दिवसांनंतरही लक्षणं दिसू शकतात. विविध प्रकारच्या चाचण्या करून या विकाराचं निदान केलं जातं. तातडीने उपचार मिळाले तर मृत्यूचा धोका कमी होऊ शकतो. श्वसनसंस्थेचं कार्य ठप्प झाल्याने अशा रुग्णांचा मृत्यू होण्याची शक्यता असते. मात्र गेल्या ५० वर्षांमध्ये या विकाराने मृत्यूला सामोऱ्या जाणाऱ्यांच्या संख्येत बरीच घट झाल्याचं पहायला मिळतं. मात्र या विकाराचा धोका कमी झालेला नाही. त्यामुळे या विकाराची लक्षणं दिसली की तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

# काळजी तारुण्यातली...



**आरोग्यवेध**

विसाव्या वर्षानंतर आयुष्य खऱ्या अर्थाने सुरू होतं. शिक्षण पूर्ण झालेलं असतं. लोकांमध्ये मिसळावं लागतं. कारकिर्दीतलं यश वाट बघत असतं. यशाची प्रत्येक पायरी चढत असताना आपण आपल्या आरोग्याकडे पूर्ण दुर्लक्ष करतो. जंक फूड खातो. कामाच्या बोज्यामुळे झोपेशी तडजोड करतो. आरोग्याकडे लक्ष देण्यासाठी आयुष्य पडलंय, हाच विचार तरुणांच्या मनात येतो. मात्र भविष्यात शरीर सुदृढ रहावं या दृष्टीने याच वयात प्रयत्न करावे लागतात. आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी तरुण वयात काय करायला हवं याविषयी...

✻ आरोग्यतपासणी चाळीशीनंतरच करायला हवी हे गरजेचं नाही. एखादा विकार झाल्यानंतर आपण डॉक्टरांकडे धाव घेतो. त्याऐवजी तुम्ही नियमित आरोग्य तपासणी करून घ्यायला हवी. याच काळात तुम्ही योग्य डॉक्टरची निवड करायला हवी. तुमचं शरीर, आरोग्य जाणून घेणारा डॉक्टर हवा.

✻ या काळात नियमित व्यायामाला प्राधान्य द्या. दैनंदिन जीवनातलं व्यायामाचं महत्त्व तुम्हाला काही वर्षांनंतर कळेल. धावायला सुरूवात करा. धावण्याचा कंटाळा असेल तर किक बॉक्सिंग क्लासला जा. सायकलिंग ग्रुपचे सदस्य व्हा. वेगवेगळे व्यायाम करत रहा.

✻ स्वयंपाक करायला शिका. या वयात मुलामुलींना थोडाफार स्वयंपाक करायला जमायला हवं. यामुळे तुम्ही आरोग्यदायी पदार्थांची निवड करू शकता. भविष्यात बाहेरच्या खाण्यासाठी लागणारे बरेच पैसे वाचवू शकता.

✻ या दिवसात अभ्यास आणि कामाचा प्रचंड ताण असतो. हा ताण कमी करण्याचे उपाय शोधा. पुस्तकं वाचा, गाणी ऐका. मेडिटेशनचं तंत्र शिका.

✻ रात्रभर काम करून किंवा मित्रमंडळींसोबत हिंडून तुम्ही घरी येता. चार ते पाच तास झोप घेऊन पुन्हा सकाळी कामाला लागता. त्यावेळी त्रास जाणवला नाही तरी कमी झोपेचे पुढे खूप वाईट परिणाम होऊ शकतात. रात्री सात ते आठ तासांची झोप गरजेची आहे हे लक्षात ठेवा. कमी झोपेमुळे तुमचं आरोग्य धोक्यात येऊ शकतं.

✻ त्वचेची काळजी घ्या. तरुण वयात त्वचा उजळ दिसत असली तरी पुरेशा काळजीअभावी तिचा पोत बिघडू शकतो. त्यामुळे उन्हात बाहेर पडताना सनस्क्रीन लावा. झोपण्याआधी मेक अप काढा आणि मॉईश्चरायझर लावून झोपा.

**नवसंशोधन**

## कॅन्सरच्या झटपट चाचणीसाठी

कॅन्सरचं निदान करायचं तर बऱ्याच चाचण्या कराव्या लागतात. यात बराच वेळ आणि पैसा खर्च होतो. रुग्णाला त्रास होतो तो वेगळाच. आता मात्र फक्त एका तपासणीने कॅन्सरचं निदान होऊ शकेल. आयआयटी मंडीतल्या शास्त्रज्ञांनी हे संशोधन केलं असून पेशींमधल्या पाण्याचं विवरण पाहण्यासाठी त्यांनी फ्लोरोसेंट रंगाच्या नॅनो डॉट्सची



निर्मिती केली आहे. सर्वसामान्य पेशींच्या तुलनेत कॅन्सरग्रस्त पेशींमध्ये पाण्याचं विवरण वेगळ्या पद्धतीने होतं. यामुळे कॅन्सरग्रस्त पेशींची ओळख पटकन पटू शकते. नॅनोडॉटची निर्मिती कार्बनपासून करण्यात आली आहे. या शोधामुळे कॅन्सरची चाचणी झटपट व्हायला मदत होईल.

**दंतारोग्य**

## असे मिळवा स्वस्त उपचार

दिवसातून दोन वेळा दात घासून आणि व्यवस्थित चूळ भरून दातांचं आरोग्य टिकवता येतं. पण काही समस्या निर्माण झाल्या तर डेंटिस्टकडे जावं लागतं. काही उपायांनी तुम्ही या उपचारांवरचा खर्च आटोक्यात ठेऊ शकता. तुमच्या परिसरातल्या दंततज्ज्ञांकडे लक्ष ठेवा. काही ठिकाणी उपचारांवर सवलती दिल्या जातात. त्याचा लाभ घेता येईल. वैद्यकीय चाचण्यांमध्ये सहभागी व्हा. या ठिकाणी रुग्णांवर मोफत उपचार केले जातात. दंतवैद्यक



महाविद्यालयात उपचार घ्या. या ठिकाणी उपचारांचं शुल्क बरंच कमी असतं. इथल्या विद्यार्थ्यांना रुग्णांच्या तपासणीतून अनुभव मिळत असतो. त्यामुळे रुग्णांकडून कमी पैसे आकारले जातात.

**डोळ्यांचं आरोग्य**

## ...म्हणून दिसतं अंधूक

अंधूक दिसत असेल तर दैनंदिन कामांमध्ये बरेच अडथळे येतात. यामागे फारशी गंभीर न वाटणारी कारणंही असू शकतात. याकडे दुर्लक्ष केलं तर कायमचं अंधत्व येण्याची शक्यता असते. ड्राय आयमुळे अंधूक दिसू शकतं. अनेक कारणांमुळे डोळे कोरडे पडतात. सातत्याने टीव्ही बघणं, मोबाइल, कॉम्प्युटरवर बराच वेळ घालवणं, वाचन या कारणांमुळे डोळे कोरडे होतात. परिणामी, तुम्हाला अंधुक दिसू शकतं.



**आजीबाईंचा बटवा**

## गुणकारी भेंडी

भेंडीची भाजी अनेकांना आवडते. ही हिरवीगार भाजी आरोग्याच्या दृष्टीनेही लाभदायी आहे. वजन कमी करणारे भेंडीचं सेवन करू शकतात. या भाजीत अगदी कमी कॅलरी असतात. यातल्या फायबरमुळे पचनसंस्थेचं कार्य सुरळीत सुरू रहातं. याचा लो ग्लायसेमिक इंडेक्स शरीरातली रक्ताची पातळी नियंत्रणात ठेवतं. भेंडीत 'क' आणि 'अ' जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असतं.



डोळ्यांच्या आरोग्यासाठी भेंडी खायला हवी. भेंडीत पोटॅशियम असतं तसंच रक्तदाब नियंत्रणात ठेवण्याचे गुणही या भाजीत असतात. त्यामुळे भेंडी पसंत करणाऱ्यांनी काळजी करू नये.

# स्ट्रॉ वापरताय?



आपण प्लास्टिक स्ट्रॉचा सर्रास वापर करतो. कोल्डड्रिंक असो वा ज्यूस, स्ट्रॉशिवाय आपण ही पेयं पित नाही. मात्र हाच स्ट्रॉ आपल्या आरोग्यासाठी घातक ठरू शकतो.

✻ कोणतंही पेय स्ट्रॉने प्यायल्यामुळे दातांमध्ये खड्डे पडण्याची शक्यता बरीच वाढते. स्ट्रॉचा नियमित वापर करणाऱ्यांना दातांच्या समस्या सतावू शकतात. स्ट्रॉने ओढून घेतलेलं पेय थेट दातांवर आपटतं. यामुळे एनामेलचा थर कमी होतो आणि दातांची झीज व्हायला सुरूवात होते.

**आपण कुठे चुकतो?**

✻ स्ट्रॉमधून फक्त पेयच शोषलं जात नाही तर हवाही शरीरात जाते. याला एअरोफॅजिया असं म्हणतात. ही हवा पचनसंस्थेत शिरकाव करते आणि गॅस, पोटफुगी अशा समस्या निर्माण होतात.


✻ चेहऱ्यावर पडणाऱ्या सुरकुत्यांमागे स्ट्रॉने पेयं पिणं हे कारण असू शकतं. स्ट्रॉने पेयं पिताना चेहऱ्याची विशिष्ट पद्धतीने हालचाल होत असल्याने तोंडाजवळ सुरकुत्या पडतात.

✻ स्ट्रॉ बनवण्यासाठी पॉलिप्रॉपेलिनचा वापर केला जातो. हे एक प्रकारचं प्लास्टिक आहे. यातली रसायनं द्रव पदार्थांमध्ये विरघळतात. यामुळे आरोग्यावर बरेच दुष्परिणाम होऊ शकतात.

✻ स्ट्रॉमुळे शरीरात जास्त साखर जाते. स्ट्रॉने पेयं पिताना अतिरिक्त द्रवपदार्थ शरीरात जातात आणि कॅलरी वाढतात.

# जीम उपकरणांवर टॉयलेट सीटपेक्षा जास्त बॅक्टेरिया

आजकाल बहुतेक तरुण निरोगी राहण्यासाठी जिममध्ये तासन्तास घाम गाळतात. जिमला जाणे ही वाईट गोष्ट नाही. जीम केल्याने तंदुरुस्त, निरोगी आणि राहता येते. व्यायाम केल्याने शरीराचे वजन संतुलित राहते. बहुतेक जीम प्रेमी हेल्दी फूड आणि त्यांच्या फिटनेसची पूर्ण काळजी घेतात; परंतु हा अलीकडील अहवाल थोडा निराश करू शकतो. टॉयलेट सीटपेक्षा जिमच्या उपकरणांवर ३६२ पट जास्त बॅक्टेरिया असतात, तर ट्रेडमिलमध्ये सार्वजनिक बाथरूमच्या टॅपपेक्षा ७४ पट जास्त जंतू असतात. ते आरोग्य बिघडवू शकतात. व्यायामशाळेतील उपकरणे वेळोवेळी वेगवेगळे लोक वापरतात. तसेच या काळामध्ये शरीरातून भरपूर घामही वाहत असतो. त्यात अनेक जंतू असतात. हेच कारण आहे की एकमेकांद्वारे वापरल्या जाणाऱ्या जीम उपकरणांच्या पृष्ठभागावर बरेच जीवाणू वाढू लागतात.



व्यायामशाळेच्या उपकरणांच्या पृष्ठभागावर इतर पृष्ठभागांच्या तुलनेत सर्वाधिक जीवाणू असतात. त्यामुळे आरोग्यास अनेक धोके निर्माण होतात. तसेच, बहुतेक बॅक्टेरिया ट्रेडमिल, सायकल आणि जिममधील फ्री वेट्समध्ये आढळतात. कारण ही उपकरणे जिममध्ये सर्वाधिक वापरली जातात. 'फिट रेटेड क्रिएटिव्ह टीम' सदस्य चेल्सी फ्रीबर्न म्हणतात, की जीम उपकरणे सामान्यतः लोकांच्या समुदायाद्वारे वापरली जातात आणि वापरण्यापूर्वी आणि नंतर पूर्णपणे स्वच्छ न केल्यास तिथे बॅक्टेरिया वेगाने वाढू शकतात. घामाघूम झालेल्या व्यक्तीशी हस्तांदोलन करताना हीच समस्या उद्भवते. या सर्व ओळखल्या जाणाऱ्या जीवाणूंपासून त्वचेच्या संसर्गाचा धोका सर्वाधिक असतो. त्यामुळे जीममध्ये जाणाऱ्या लोकांनी स्वच्छतेची काळजी घेतली पाहिजे, यासाठी जिमची उपकरणे वापरण्यापूर्वी आणि नंतर ती निर्जंतुक केले पाहिजेत. तसेच, व्यायामानंतर हात चांगले धुवावेत. त्यामुळे हानिकारक जीवाणूंचा संसर्ग टाळता येईल. जिममधून बाहेर पडल्यानंतर आंघोळ करावी.

# उपचार प्रोस्टेट ग्रंथींवरचे

**आयुर्वेद आणि विकार**

पुरुषांमध्ये प्रोस्टेट ग्रंथींशी संबंधित समस्या आढळतात. त्यातही पन्नाशीनंतर पुरुषांना ही समस्या जास्त सतावते. सर्वसामान्य प्रोस्टॅस्टिटीसपासून जीवघेण्या प्रोस्टेट कॅन्सरपर्यंत या ग्रंथींशी संबंधित बरेच विकार असतात. त्यावर वेळेत उपचार होणं गरजेचं असतं. प्रोस्टेट ग्रंथींशी संबंधित विविध प्रकारांनुसार आयुर्वेदात उपचार सांगण्यात आले आहेत. त्याविषयी जाणून घेऊ या.



✻ पित्तदोषांमुळे निर्माण होणारे प्रोस्टेट ग्रंथींशी संबंधित विकार पुनर्नवा, बार्ली आणि खसखस अशा औषधी वनस्पतींच्या सेवनाने आटोक्यात राहू शकतात. या वनस्पतींमध्ये थंडावा देणारे गुणधर्म असतात. यामुळे पित्ताची तीव्रता कमी होते आणि आराम मिळतो.

✻ वातदोषांमुळे निर्माण होणाऱ्या प्रोस्टेट ग्रंथींच्या समस्या दूर करण्यासाठी सालेप ऑर्किडच्या मुळांचा वापर करावा. यात शरीराचं झालेलं नुकसान भरून काढण्याची क्षमता असते. यासोबतच गुग्गुळ, पुनर्नवा आणि गोक्षुरासारख्या वनस्पतीही लाभदायी ठरतात.

✻ दालचिनी, गुग्गुळ, आलं, शैलजीत हे औषधी घटक कफदोषांमुळे निर्माण होणाऱ्या समस्या दूर करायला मदत करतात. गुग्गुळात शरीर शुद्ध करण्याचे गुण असतात. त्यामुळे कफदोषांचा प्रभाव कमी होतो.

✻ प्रोस्टेट ग्रंथींचा आकार वाढल्यानेही बराच त्रास होतो. अशा परिस्थितीत काटेरी किंवा कडवट लेट्यूसचा रस उपयुक्त ठरतो. शैलजीत आणि चरक या औषधी वनस्पतींचा वापरही यासाठी केला जातो.


# व्यायामाने मेंदू तीक्ष्ण

आरोग्यासाठी व्यायाम अत्यंत फायदेशीर आहे. यामुळे शरीर तंदुरुस्त, निरोगी आणि तंदुरुस्त राहते. नुकतेच एका संशोधनातून असे समोर आले आहे, की आठवड्यातून फक्त दोन दिवस व्यायाम केल्याने मेंदू तीक्ष्ण होतो आणि मेंदूशी संबंधित आजार टाळता येतात. शारीरिकदृष्ट्या सक्रिय असण्यामुळे अल्झायमरसारख्या न्यूरोडीजनरेटिव्ह रोगांनादेखील प्रतिबंध होतो. व्यायामामुळे मेंदूचे आजारांपासून संरक्षण होते. आठवड्यातून दोन ते तीन दिवस हलका वर्कआउट केल्यानेही मेंदू निरोगी होऊ शकतो. विशेषतः हिप्पोकॅम्पस आणि टेम्पोरल लोब सारख्या प्रमुख भागांना त्याचा खूप फायदा होतो. यामुळे स्मरणशक्ती वाढते आणि मेंदू सक्रिय होतो. एका अभ्यासात असे आढळून आले की चालणे, सायकल चालवणे यासारखे मध्यम किंवा कठीण व्यायामदेखील मेंदूच्या अनेक भागांना फायदेशीर ठरण्यासाठी पुरेसे आहेत. हे ओसीपीटल आणि पॅरिएटल लोब, हिप्पोकॅम्पस आणि फ्रंटल कॉर्टेक्सला खूप फायदे प्रदान करते. व्यायामादरम्यान सोडली जाणारी प्रथिने मेंदूला निरोगी बनवण्यास मदत करतात. १०,१२५ मेंदूच्या स्कॅनचे विश्लेषण केल्यानंतर, संशोधकांना असे आढळून आले, की व्यायामाचे केवळ शारीरिकच नव्हे तर मानसिकदृष्ट्याही खूप फायदे आहेत.



# वाढत्या प्रदूषणामुळे आयस्ट्रोक

वाढते प्रदूषण शरीराला अनेक प्रकारे हानी पोहोचवते. प्रदूषणाचा डोळ्यांवर गंभीर परिणाम होतो. यामुळे ड्राय आय सिंड्रोम आणि अगदी आय स्ट्रोकसारख्या समस्या उद्भवू शकतात. कोरड्या डोळ्यांमुळे डोळ्यांमध्ये जळजळ, खाज सुटणे आणि वेदना होतात, तर डोळ्यांचा झटका ही धोकादायक स्थिती आहे. हा डोळ्यांचा गंभीर आजार आहे जो डोळ्यांच्या मज्जातंतूंच्या समस्यांमुळे होतो.



प्रदूषणामुळे डोळ्यांना रक्तपुरवठा करणाऱ्या नसांमध्ये सूज आणि रक्त गोठण्याची शक्यता असते. डोळ्याच्या झटक्याचे दोन प्रकार आहेत. पहिला इस्केमिक आय स्ट्रोक आहे, ज्यामध्ये रक्तवाहिन्या (डोळ्यांच्या शिरा) मध्ये गुठळ्या झाल्यामुळे डोळ्यांना रक्तपुरवठा कमी होतो. दुसरा म्हणजे रक्तस्रावी डोळ्याचा झटका. यामध्ये रक्तवाहिन्या फुटल्याने डोळ्यांना रक्तपुरवठा वाढतो. ही स्थिती डोळ्यांसाठी धोकादायक आहे.

डोळ्यांच्या झटक्यावर उपचार करण्यासाठी औषधे, शस्त्रक्रिया, लेझर थेरपी, ऑक्सिजन थेरपी आणि फिजिओथेरपी वापरली जाते. हा आजार केवळ प्रदूषणामुळेच नाही, तर मधुमेह आणि वाढत्या लठ्ठपणामुळेही होऊ शकतो. डोळा दुखणे, अंधुक दृष्टी, डोळे लाल होणे, डोळ्यांत सूज येणे, डोकेदुखी, मानसिक ताण ही या आजाराची लक्षणे आहेत. डोळ्यांच्या व्यायामामुळे डोळ्यांचे स्नायू मजबूत होतात. डोळ्यांमध्ये आय ड्रॉप्स टाका, यामुळे डोळ्यांची जळजळ होणार नाही.

# अहमदनगर शहरातील निवडणूक १९५१ ते २०१९ आतापर्यंतचे निकाल

## सार्वत्रिक निवडणूक १९५१

एकूण मतदार ६०,९८२, झालेले मतदान २९,६८८, टक्केवारी ४८.६८

| प्रमुख उमेदवार | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| कुटे विठ्ठल गणपत | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | १६,७७८ (विजयी) |
| करंदीकर काशिनाथ शंकर | समाजवादी पार्टी | ५,५८९ |
| भापकर हिराबाई प्रभाकर | कामगार किसान पक्ष | ५,०६५ |

## सार्वत्रिक निवडणूक १९५७

एकूण मतदार ५५,५४२, झालेले मतदान ३३,०७२, टक्केवारी ५९.५४

| प्रमुख उमेदवार | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| भारदे त्र्यंबक शिवराम | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | १८,६७४ (विजयी) |
| रानडे कमला श्रीराम | अपक्ष | १४,३९८ |

## सार्वत्रिक निवडणूक १९६२

एकूण मतदार ६३,६३९, झालेले मतदान ३६,८७७, टक्केवारी ५७.९५

| प्रमुख उमेदवार | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| भारदे त्र्यंबक शिवराम | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | १७,२७० (विजयी) |
| नवशेरवान नवरोजजी सथ्था | अपक्ष | १२,३४१ |
| रामय्या दगडू आडेप | जनसंघ | ४,५८२ |

## सार्वत्रिक निवडणूक १९६७

एकूण मतदार ७०,९४८, झालेले मतदान ४७,६१६ टक्केवारी ६७.११

| प्रमुख उमेदवार | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| एस. व्ही. निसळ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | १६,४८५ (विजयी) |
| पी. के. भापकर | अपक्ष | १४,६७७ |
| एन. एन. बार्शीकर | अपक्ष | ९,९०० |
| एन. जी. करमरकर | भारतीय जनसंघ | ३,२०५ |

## सार्वत्रिक निवडणूक १९७२

एकूण मतदार ८२,७७७, झालेले मतदान ५१,२९९ टक्केवारी ६१.९७

| प्रमुख उमेदवार | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| नारायणदास बार्शीकर | अपक्ष | २८,४०६ (विजयी) |
| रानडे कमला श्रीराम | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | १३,२८६ |
| रामचंद्र रत्नाकर | भारतीय कम्युनिस्ट पक्ष | ४,६९६ |
| पद्माकर देशमुख | भारतीय जनसंघ | २,४०५ |

## सार्वत्रिक निवडणूक १९७८

एकूण मतदार १,०१,०७३, झालेले मतदान ६९,५७० टक्केवारी ६८.८३

| प्रमुख उमेदवार | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| कुमार सप्तर्षी | जनता पक्ष | १९,०३९ (विजयी) |
| ना. ज. पाऊलबुद्धे | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | १८,६९१ |
| बार्शीकर नवनीत | अपक्ष | १४,३६९ |
| श्रीकांत बेडेकर | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस(आय) | ९,५०९ |
| रत्नाकर रामचंद्र कृष्णाजी | भारतीय कम्युनिस्ट पक्ष | ५,७६२ |

## सार्वत्रिक निवडणूक १९८०

एकूण मतदार १,२०,२७४, झालेले मतदान ६६,९६३ टक्केवारी ५५.६८

| प्रमुख उमेदवार | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| असीर एस.एम.आय. | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस(आय) | ३०,१२२ (विजयी) |
| ना. ज. पाऊलबुद्धे | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस (यु) | २७,८०० |
| मुकुंद घैसास | जनता पक्ष (जेपी) | ७,९७१ |

## सार्वत्रिक निवडणूक १९८५

एकूण मतदार १,३१,७४६, झालेले मतदान ८०,८८७ टक्केवारी ६१.४०

| प्रमुख उमेदवार | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| कळमकर दादासाहेब दशरथ | भारतीय कॉंग्रेस(समाजवादी) | ४९,९२९ (विजयी) |
| असीर शेख मोहम्मद इस्माईल | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | २५,९८० |

## सार्वत्रिक निवडणूक १९९०

एकूण मतदार १,७४,२०९, झालेले मतदान १,१३,६९८ टक्केवारी ६५.२७

| प्रमुख उमेदवार | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| अनिल रामकिसन राठोड | शिवसेना | ४४,४१९ (विजयी) |
| कळमकर दादाभाऊ दशरथ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ३१,६३८ |
| जगताप अरुण बलभीम | जनता दल | २५,८६२ |
| बार्शीकर नवनीतभाई | अपक्ष | १०,७११ |

## सार्वत्रिक निवडणूक १९९५

एकूण मतदार १,९३,८१८, झालेले मतदान १,३१,४५१ टक्केवारी ६७.८२

| प्रमुख उमेदवार | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| अनिल रामकिसन राठोड | शिवसेना | ६१,२८९ (विजयी) |
| कळमकर दादाभाऊ दशरथ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ३५,४६१ |
| घुले शंकरराव हरिभाऊ | अपक्ष | १८,७०२ |

## सार्वत्रिक निवडणूक १९९९

एकूण मतदार २,०२,८५५, झालेले मतदान १,११,१८८ टक्केवारी ५४.८१

| प्रमुख उमेदवार | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| अनिलभैय्या राठोड | शिवसेना | ३८,९२५ (विजयी) |
| कळमकर दादाभाऊ दशरथ | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | २२,०२६ |
| सारडा ब्रिजलाल झुंबरलाल | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | २१,८३७ |
| अरुणकाका बलभीम जगताप | अपक्ष | १४,७४४ |
| गोपाळराव माधवराव झोडगे | अपक्ष | ४,१०२ |

## सार्वत्रिक निवडणूक २००४

एकूण मतदार २,३८,३७५, झालेले मतदान १,३४,०७५ टक्केवारी ५६.२४

| प्रमुख उमेदवार | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| अनिलभैय्या राठोड | शिवसेना | ७८,१९२ (विजयी) |
| कळमकर दादाभाऊ दशरथ | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | ५२,७४२ |

## सार्वत्रिक निवडणूक २००९

एकूण मतदार २,६७,७१२, झालेले मतदान १,३२,६४७ टक्केवारी ४९.५०

| प्रमुख उमेदवार | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| अनिलभैय्या राठोड | शिवसेना | ६५,२७१ (विजयी) |
| गुंदेचा सुवालाल आनंदराम | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | २५,७२६ |
| आगरकर अभय जगन्नाथ | अपक्ष | १७,७८१ |
| शेख नजीर (नज्जू पैलवान) | अपक्ष | ८,६६० |
| डफळ सचिन चंद्रभान | मनसे | ७,४४१ |
| अशोक विठ्ठल सोनवणे | आरपीआय (आठवले) | ४,१५५ |

## सार्वत्रिक निवडणूक २०१४

एकूण मतदार २,७६,०४५, झालेले मतदान १,६५,९३४ टक्केवारी ६०.०५

| प्रमुख उमेदवार | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| संग्राम जगताप | राष्ट्रवादी कॉंग्रेस | ४९,३७८ (विजयी) |
| अनिलभैय्या राठोड | शिवसेना | ४६,०६१ |
| आगरकर अभय जगन्नाथ | भाजप | ३९,९१३ |
| तांबे सत्यजित सुधीर | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | २७,०७६ |

## सार्वत्रिक निवडणूक २०१९

एकूण मतदार २,८९,६२९ झालेले मतदान १,७३,३३९ टक्केवारी ५८.७५

| प्रमुख उमेदवार | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| संग्राम जगताप | राष्ट्रवादी कॉंग्रेस | ८१,२१७ (विजयी) |
| अनिलभैय्या राठोड | शिवसेना | ७०,०७८ |
| आसिफ सुलतान | एमआयएम | ६,८६९ |
| श्रीपाद छिंदम | बहुजन समाज पार्टी | २,९२३ |
| किरण गुलाबराव काळे | वंचित बहुजन आघाडी | २,८८१ |

# संगमनेर मतदारसंघातील बाळासाहेब थोरात यांनी १९८५ पासून २०१९ पर्यंत लढलेल्या निवडणुका

## सार्वत्रिक निवडणूक १९८५

एकूण मतदार १,२९,०३४, झालेले मतदान ९२,३१४ टक्केवारी ७१.५४

| प्रमुख उमेदवार | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| थोरात बाळासाहेब भाऊसाहेब | अपक्ष | ४०२१८ (विजयी) |
| थोरात शकुंतला खंडेराव | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ३००५९ |
| आंधळे गंगाधर बजाबा | भारतीय कॉंग्रेस (समाजवादी) | १५२०८ |

## सार्वत्रिक निवडणूक १९९०

एकूण मतदार १,६८,४३४, झालेले मतदान १,७०,४५५ टक्केवारी ६९.७३

| प्रमुख उमेदवार | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| थोरात बाळासाहेब भाऊसाहेब | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ५७४६५ (विजयी) |
| गुंजाळ वसंतराव सखाराम | भाजपा | ५२६०३ |
| सावंत दशरथ नामदेव | जनता दल | १७१३ |

## सार्वत्रिक निवडणूक १९९५

एकूण मतदार १,८८,२९२, झालेले मतदान १,४८,१४२ टक्केवारी ७८.६८

| प्रमुख उमेदवार | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| थोरात बाळासाहेब भाऊसाहेब | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ७३६११ (विजयी) |
| गुळवे बापूसाहेब नामदेव | अपक्ष | ५८९५७ |
| नवले साहेबराव रामचंद्र | जनता दल | ६७७९ |

## सार्वत्रिक निवडणूक १९९९

एकूण मतदार १,९४,५६५, झालेले मतदान १,४४,६३९ टक्केवारी ७४.३०

| प्रमुख उमेदवार | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| थोरात बाळासाहेब भाऊसाहेब | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ६१९७५ (विजयी) |
| गुळवे बापूसाहेब नामदेव | शिवसेना | ४०५२४ |
| शिंदे कृष्णाराव उर्फ दिलीप सयाराम | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | ३०७९९ |

## सार्वत्रिक निवडणूक २००४

एकूण मतदार २,३२,२७१, झालेले मतदान १,६९,०३३ टक्केवारी ७२.७७

| प्रमुख उमेदवार | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| थोरात बाळासाहेब भाऊसाहेब | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | १२००५८ (विजयी) |
| संभाजीराव रामचंद्र थोरात | शिवसेना | ४०३०१ |
| सूर्यभान बाबूराव गोरे | बसपा | ४६३६ |

## सार्वत्रिक निवडणूक २००९

एकूण मतदार २,२९,२४९ झालेले मतदान १,५३,२६७ टक्केवारी ६६.८०

| प्रमुख उमेदवार | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| थोरात बाळासाहेब भाऊसाहेब | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ९६६८६ (विजयी) |
| कुटे बाबासाहेब धोंडिबा | शिवसेना | ४१३१० |
| निशाताई शिऊरकर | समाजवादी जन परिषद | ४२२७ |

## सार्वत्रिक निवडणूक २०१४

एकूण मतदार २,५३,९२७ झालेले मतदान १,८२,२३२ टक्केवारी ७१.७०

| प्रमुख उमेदवार | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| थोरात बाळासाहेब भाऊसाहेब | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | १०३५६४ (विजयी) |
| आहेर जनार्धन म्हातारबा | शिवसेना | ४४७५९ |
| राजेश माधव चौधरी | भाजपा | २५००७ |
| आबासाहेब संभाजी थोरात | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | २६५० |

## सार्वत्रिक निवडणूक २०१९

एकूण मतदार २,७०,४९९ झालेले मतदान १,९४,९०२ टक्केवारी ७१.९९

| प्रमुख उमेदवार | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| थोरात बाळासाहेब भाऊसाहेब | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | १२५३८० (विजयी) |
| नवले साहेबराव रामचंद्र | शिवसेना | ६३१२८ |

# निकाल जाहीर झालेले मतदारसंघ

## अकोले (२१६)

| नाव | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| अमित भांगरे | राष्ट्रवादी (श.प.) | ६८४०२ |
| डॉ. किरण लहामटे | राष्ट्रवादी (अ.प.) | ७३९५८(विजयी) |
| वैभव पिचड | अपक्ष | ३२७८३ |
| मारुती देवराम मेंगळ | अपक्ष | १०८३० |

## संगमनेर (२१७)

| नाव | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| अमोल खताळ | शिवसेना (शिंदे) | ११२३८६(विजयी) |
| बाळासाहेब थोरात | काँग्रेस | १०१८२६ |

## शिर्डी (२१८)

| नाव | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| राधाकृष्ण विखे | भाजप | १४४७७८(विजयी) |
| प्रभावती घोगरे | काँग्रेस | ७४४९६ |
| डॉ. राजेंद्र पिपाडा | अपक्ष | १५१० |

## कोपरगाव (२१९)

| नाव | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| आशुतोष काळे | राष्ट्रवादी (अ.प.) | १६११४७(विजयी) |
| संदीप वर्पे | काँग्रेस | ३६५२३ |

## नेवासा (२२१)

| नाव | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| शंकरराव गडाख | शिवसेना (उद्धव) | ९१४२३ |
| विठ्ठलराव लंघे | शिवसेना (शिंदे) | ९५४४४(विजयी) |
| बाळासाहेब मुरकुटे | प्रहार आघाडी | ३५३३१ |

## अहमदनगर (२२५)

| नाव | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| अभिषेक कळमकर | राष्ट्रवादी (श.प.) | ७७८८० |
| संग्राम जगताप | राष्ट्रवादी (अ.प.) | ११७३३२(विजयी) |
| सचिन डफळ | मनसे | ११२१ |

## श्रीरामपूर (२२०)

| नाव | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| हेमंत ओगले | काँग्रेस | ६५४३१(विजयी) |
| लहू कानडे | राष्ट्रवादी (अ.प.) | ४२१६२ |
| भाऊसाहेब कांबळे | शिवसेना (शिंदे) | ५२४३६ |
| सागर अशोक बेग | अपक्ष | ४७४३० |

# मतमोजणी सुरु असलेले मतदारसंघ

## शेवगाव (२२२)

| १८ वी फेरी अखेर मिळालेली मते | | |
|---|---|---|
| नाव | पक्ष | मिळालेली मते |
| ॲड. प्रताप ढाकणे | राष्ट्रवादी (श.प.) | ४४०७२ |
| मोनिका राजळे | भाजप | ७१३६५ |
| चंद्रशेखर घुले | अपक्ष | ५१६३५ |
| हर्षदा काकडे | अपक्ष | १०१४३ |

## राहुरी (२२३)

| १५ वी फेरी अखेर मिळालेली मते | | |
|---|---|---|
| नाव | पक्ष | मिळालेली मते |
| शिवाजीराव कर्डिले | भाजप | ८८९०० |
| प्राजक्त तनपुरे | राष्ट्रवादी (श.प.) | ७७२८६ |

## पारनेर (२२४)

| १९ वी फेरी अखेर मिळालेली मते | | |
|---|---|---|
| नाव | पक्ष | मिळालेली मते |
| काशिनाथ दाते | राष्ट्रवादी (अ.प.) | ८२३११ |
| राणीताई लंके | राष्ट्रवादी (श.प.) | ७८३४७ |
| विजय स. औटी | अपक्ष | ६६९ |
| विजय भा. औटी | अपक्ष | २१२५ |
| संदेश कार्ले | अपक्ष | ५८१४ |

## श्रीगोंदा (२२६)

| २० वी फेरी अखेर मिळालेली मते | | |
|---|---|---|
| नाव | पक्ष | मिळालेली मते |
| अनुराधा नागवडे | शिवसेना (उद्धव) | ४२५५७ |
| विक्रम पाचपुते | भाजप | ७७६१२ |
| अण्णासाहेब शेलार | वंचित | २२०४० |
| राहुल जगताप | अपक्ष | ५२४४७ |
| सुवर्णा पाचपुते | अपक्ष | १२२८ |

## कर्जत-जामखेड (२२७)

| २२ वी फेरी अखेर मिळालेली मते | | |
|---|---|---|
| नाव | पक्ष | मिळालेली मते |
| प्रा. राम शिंदे | भाजप | १,१०,०१२ |
| रोहित पवार | राष्ट्रवादी (श.प.) | १,०८,९८९ |

